RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

# दैनिक विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती
११ बुधवार फेब्रुवारी २०२६
* वर्ष ५ * अंक २५७
* पृष्ठ : ६ * मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी? मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

# महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक

## दावोस मधील 75 टक्के करारांचे उद्योगात रूपांतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची माहिती

**विदर्भ केसरी।**



देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत असते. मात्र आता ही गुंतवणूक देशात जास्तच नाही, तर रेकॉर्ड मोडणारी ठरत आहे. आर्थिक व्यवस्थेला उत्सवाचे स्वरूप दिल्यामुळेच उद्योगस्नेही वातावरण राज्यात तयार झाले आहे. यामुळेच महाराष्ट्रात 'रेकॉर्ड तोड' गुंतवणूक होत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्वित्झर्लंड मधील दावोस येथे जागतिक अर्थ परिषदेत ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच १२ लाख कोटींचे करार अंतिम करण्यात आले आहे. या जागतिक परिषदेत परकीय गुंतवणूक असेल तेच करार करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे प्रत्येक करारातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक येणार आहे. दावोस येथे महाराष्ट्राच्या दालनाला गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तेथे १० राज्यांपैकी महाराष्ट्राचाच बोलबाला होता. या परिषदेत झालेल्या करारांचे प्रत्यक्षात उद्योगात रूपांतर होण्याचे राज्याचे प्रमाण ७५ टक्के आहे.

राज्यात 'इज ऑफ डूइंग बिझनेस' करण्यासाठी 'हंड्रेड रिफॉर्म्स इन टू मंथ' असा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध १०० सुधारणांनी उद्योगस्नेही वातावरण गुंतवणूकदारांना अधिकाधिक आकर्षित करणार आहे. तसेच मैत्री पोर्टलच्या माध्यमातून उद्योगांसाठी सिंगल विंडो सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे. राज्याच्या सर्व दूर भागात गुंतवणूक होत आहे. गडचिरोली 'स्टील सिटी ऑफ इंडिया' म्हणून समोर येत आहे. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये नागपूर नाव ठळकपणे पुढे आले आहे. महिंद्रा कंपनीने १५ हजार कोटींची गुंतवणूक नागपूर येथे केली आहे. या ठिकाणी भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा ऑटोमोबाईल प्रकल्प महिंद्रा कंपनी उभारत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


देशात विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या निर्मितीची सर्वात मोठी क्षमता छत्रपती संभाजीनगरमध्ये तयार होत आहे. पुढील पिढीची विद्युत वाहने संभाजीनगरमध्ये उत्पादित केल्या जाणार आहे. दावोसमध्ये उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यात गुंतवणूक आली आहे. धुळे जिल्ह्यातील नरडाणा औद्योगिक वसाहत भविष्यातील उद्योगांचे मॅग्नेट ठरणार आहे.

नंदुरबारसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात उद्योग येत आहेत. केवळ औद्योगिकीकरणावर शासनाचा भर नाही तर त्यामुळे एक चांगली परिसंस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. राज्यात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक वर्तमानपत्र वाचले पाहिजे. याकरिता वर्तमानपत्र वाचनावर आधारित उपक्रम सुरू करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

■ **देवेंद्र फडणवीस म्हणाले, १ मे २०२६ पर्यंत आपले सरकार पोर्टलचा टप्पा दोन कार्यान्वित करण्यात येणार आहे. राज्यात सध्या १ हजार सेवा ऑनलाइन स्वरूपात देण्यात येत आहेत. मात्र यापैकी २९ सेवा या ९९ टक्के नागरिकांना लागत असतात. या २९ सेवा सुलभ, जबाबदारीने आणि गतिशीलपणे नागरिकांना दिल्या तर नागरिकांना शासनाकडे येण्याचे काम पडणार नाही त्यांचे समाधान होऊ शकेल. ई- गव्हर्नन्स मुळे शासकीय सेवेमध्ये निश्चितच गतिशीलता आली आहे. अधिक गतिशीलता आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचापण उपयोग केल्या जाणार आहे.**

# अजितदादांचा घातपात झाला:रोहित पवार

**विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार व दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे आमदार रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अजित पवारांच्या विमानाला झालेल्या अपघाताबद्दल अनेन प्रश्न उपस्थित करत घातपाची शक्यता व्यक्त केली. विमानाची तांत्रिक स्थिती, प्रत्यक्षदर्शीचे जबाब, सीसीटिव्ही फुटेज यातून पुढे आलेल्या माहितीकडे लक्ष वेधताना याची भारतीय एजन्सीबरेबारच फ्रान्समधील बीईए आणि अमेरिकेतील एएआयबी या आंतरराष्ट्रीय एजन्सीकडून चौकशी करावी अशी मागणी रोहित पवार यांनी केली.

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेक जणांकडून शंका व्यक्त होत असताना खुद्द पवार कुटुंबातील आ. रोहित पवार यांनी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पत्रकार परिषद घेऊन अजितदादाच्या विमान अपघाताबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. व्हीएसआर व्हेंचर्स या कंपनीबद्दल प्रश्न उपस्थित केले. युरोपियन एजन्सींनी या कंपनीचे परवाने रद्द केले होते. तरीही या कंपनीची विमान भारतात उडत आहेत. अजित पवारांचा मृत्यू होऊनही या कंपनीवर अद्याप बंदी का घातली जात नाही ? असा सवाल त्यांनी केला.

बारामतीला अद्ययावत आयएलएस सिस्टीम नसल्याने अपघात झाल्याचे काही लोक सांगतायत. या विमानतळावर यापूर्वी अनेक विमाने, व्हीआयपी, उद्योगपती उतरले आहेत. या विमानाचा मुंबई विमान तळावर अपघात झाला होता. तिथे तर अद्यावत आयएलएस यंत्रणा होती, तरीही अपघात झाला होता. त्या अपघाताचा रिपोर्ट अद्याप का आलेला नाही? तो रिपोर्ट दाबला गेला नसता तर कदाचित अजित दादांचा अपघात वाचवता आला असता असेही रोहित पवार म्हणाले. या कंपनीच्या सर्व विमानांचे आणि गेल्या १० दिवसांच्या सीसीटीव्ही फुटेजचे सखोल ऑडीट करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

### अजित पवार यांनी प्लॅन का बदलला?

■ **अजित पवार यांचा विमान प्रवास हा पूर्वनियोजीत नव्हता तर तो ऐनवेळी ठरला होता, असा दावाही रोहित पवार यांनी केला. २७ जानेवारीला संध्याकाळी अजित पवार गाडीने पुण्याला निघणार होते. त्यांचा ताफाही तयार होता. मात्र दोन कारणांमुळे त्यांचा प्रवास रद्द झाला पूर्व विदर्भातील एका मोठा नेता दादांना भेटायला येणार होता त्यांना उशीर झाला. तसेच एका फाईलसाठी अजित पवारांना थांबावे लागल्याचा दावा रोहित पवार यांनी केला.**

■ **अजित पवारांच्या पक्षातील काही लोकांना अपघाताबद्दल शंका आहे. त्यांच्याच पक्षातील अमोल मिटकरी यांनी मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी केली आहे. मात्र दादांच्या जवळ असणारे जबाबदार नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ या नेत्यांना असे प्रश्न का पडले नाहीत ? त्यांनी चौकशीची मागणी का केली नाही? या प्रश्नावर उत्तर देताना रोहित पवार म्हणाले की, त्या सर्व नेत्यांना आपली सत्ता शाबूत राहण्यासाठी हे प्रश्न महत्वाचे वाटत नसतील. काकींची (सुनेत्रा पवार) इच्छा नसताना शपथविधीची घाई केली गेली.**

# राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन 23 फेब्रुवारी पासून

**विदर्भ केसरी।**

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार दि. 23 फेब्रुवारी 2026 ते बुधवार दि. 25 मार्च 2026 पर्यंत निश्चित करण्यात आले आहे. दिनांक 6 मार्च 2026 रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे, असा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

विधानभवन येथे आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री अँड.आशिष शेलार, आमदार सर्वश्री अनिल परब, प्रसाद लाड, भास्कर जाधव, जयंत पाटील, सुनील प्रभु, भाई जगताप, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री दिवंगत अजित पवार यांना कामकाज सल्लागार समितीच्या दोन्ही बैठकीत श्रद्धांजली वाहण्यात आली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. अधिवेशन काळात शनिवार दि. 28 फेब्रुवारी 2026 रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळ कामकाज होणार आहे.सोमवार दि. 2 मार्च 2026 रोजी होळी आणि 3 मार्च 2026 रोजी धूलिवंदन असल्याने कामकाज होणार नाही. दिनांक 1,7,8,14,15,21,22 मार्च रोजी शासकीय सुट्टी आणि दिनांक 19 मार्चला गुढीपाडव्याची सार्वजनिक सुटी असल्याने या दिवशी कामकाज होणार नाही. तर दि.20 मार्च रोजीही विधिमंडळ कामकाज होणार नाही.

# 'उपरवाला सब देख रहा है!'

## 12 वीच्या परीक्षेत कॉपी बहाद्दरांना सीसीटीव्हीचा दणका

**विदर्भ केसरी।**




छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागाने 'कॉपीमुक्त' अभियानांतर्गत आजवरची सर्वात मोठी धडक कारवाई केली आहे. कन्नड तालुक्यातील जेतपूर येथील परीक्षा केंद्रावर सीसीटीव्हीच्या साहाय्याने कॉपीचा प्रकार उघडकीस आणत, तब्बल 19 पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांविरुद्ध निलंबनासह कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. यामुळे संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मंगळवारी (दि. 10 फेब्रुवारी) इयत्ता 12 वीचा इंग्रजी विषयाचा पेपर होता. तालुक्यातील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जेतपूर येथील परीक्षा केंद्रावर काही विद्यार्थी एकमेकांच्या उत्तरपत्रिका पाहून आणि उत्तरांच्या झेरॉक्स प्रति वापरून गैरप्रकार करत असल्याचे निदर्शनास आले. या तक्रारीची दखल घेत भरारी पथकाने सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. यामध्ये पर्यवेक्षकांच्या डोळ्यांदेखत विद्यार्थी कॉपी करत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागीय बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांच्या आदेशानुसार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक आणि बैठे पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. खासगी संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांवर त्यांच्या संस्थामार्फत शिस्तभंगात्मक आणि कायदेशीर कारवाई प्रस्तावित केली आ

# वडिलांच्या निधनानंतर लेकीने दिला बारावी इंग्रजीचा पेपर

**विदर्भ केसरी। भंडारा :**



मनाला चटका लावून जाणारी एक घटना भंडारा जिल्ह्यात आज घडली. एकीकडे वडिलांचा अपघाती मृत्यू. घरात शोककळा आणि दुसरीकडे बारावीची परीक्षा ! वडिलांच्या निधनाचे दुःख बाजूला सारून अत्यंत दुर्दैवी व कठिण परिस्थितीतही लेकीने धैर्याने परीक्षा दिली.

जान्हवी हौशीलाल राहांगडाले असे या लेकीचे नाव असून तीची कहाणी खरोखरच मन हेलावून टाकणारी आणि तितकीच प्रेरणादायी आहे. दुःखाच्या गर्तेतही शिक्षणाची मशाल हातात घट्ट पकडणाऱ्या जान्हवीच्या जिद्दीने अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तर अनेकांसमोर प्रेरणा निर्माण केली आहे.

तुमसर तालुक्यातील आंबागड येथील रहिवासी हौशीलाल राहांगडाले (५१) हे सोमवार दुपारच्या सुमारास सायकलने घरी परत येत असताना त्यांचा तोल गेल्याने ते खाली कोसळले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. काही वेळातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. क्षणात कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. दरम्यान, मंगळवारी (१० फेब्रुवारी) बारावी बोर्ड परीक्षेचा पहिला दिवस होता. हौशीलाल राहांगडाले यांची कन्या जान्हवी हिचा इंग्रजी विषयाचा पेपर होता. ती जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, तुमसर येथील विद्यार्थिनी असून याच परीक्षा केंद्रात सकाळी दहाच्या सुमारास मामाच्या मुलासोबत परीक्षा केंद्रात दाखल झाली.

कुटुंबीयांनी शाळेचे मुख्याध्यापक पंकज बोरकर व केंद्र संचालक प्रा. नीलकंठ कापगते यांना जान्हवीच्या वडिलांच्या मृत्यूची माहिती दिली. दोघांनीही तिला धीर देत मानसिक आधार दिला. डोळ्यांत अश्रू, मनात वडिलांचे स्मरण करत जान्हवीने खंबीरपणे इंग्रजीचा पेपर सोडविला. परीक्षा पूर्ण होताच तीने अश्रूंना वाट मोकळी करून दिली. 'बारावीची परीक्षा ही जीवनातील टर्निंग पॉईंट'. वडिलांचा चेहरा सतत डोळ्यांसमोर येत होता, पण त्यांच्या स्वप्नांसाठी मी ही परीक्षा दिली अशी भावनिक प्रतिक्रियाही जान्हवीने व्यक्त केली.

### जान्हवी ही हुशार विद्यार्थिनी

■ **जान्हवी ही अभ्यासात अत्यंत हुशार असल्याचे तिला शिकविणारे प्रा. नितीन पाटील, प्रा. गणेश चाचीरे यांनी सांगितले. तिच्या घरची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत बेताची आहे. परिस्थिती मात करून तिने शिक्षण घेण्याचे ठरविले. आंबागड ते तुमसर हे अंतर आठ किलोमीटर आहे. दररोज मात्र ती नियमित येत होती.**

# बारावीचा इंग्रजीचा पेपर शांततेत

**विदर्भ केसरी।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे द्वारा घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला आज मंगळवार १० फेब्रुवारीपासून सुरूवात झाली. पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाचा पेपर जिल्ह्यातील ५६ परीक्षा केंद्रांवरून विद्यार्थ्यांनी शांततेत सोडविला. परीक्षा सुरू होण्याच्या एक तास आधी सर्व परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी व त्यांच्या पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व केंद्रांवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबवण्यात आले. जिल्हा व तालुका स्तरावर भरारी गठित करण्यात आले होते. या पथकांनी विविध परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी देत परिस्थितीचा आढावा घेतला. काही केंद्रांवर आढळलेल्या त्रुटींविषयी केंद्र प्रमुख व उपस्थित पर्यवेक्षकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. कॉपीमुक्त परीक्षा यावर जिल्ह्यात प्रशासनाने भर दिला. सर्व परीक्षा केंद्रांच्या दर्शनीय ठिकाणी सूचना फलक लावून विद्यार्थ्यांचे आसन क्रमांक कुठल्या खोलीत आहे याची माहिती जाहीर करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या एक तास आधी प्रवेशपत्रासह केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.बारावीचा पहिला पेपर जिल्ह्यात शांततेत पार पडल्याचे शिक्षणाधिकारी (माध्य.) महेंद्र गजभिये यांनी सांगितले.

# झाडांना विषारी लस टोचून डिंकाची चोरी

**विदर्भ केसरी। धारणी,**

मेळघाटच्या नैसर्गिक वनसंपदेवर परप्रांतीय व तस्करांचा डोळा लागलेला असून सागाचे लाकूड व सालई डिंकाच्या झाडावर संक्रांत आलेली आहे. धारणी व चिखलदरा तालुक्यात सागाचे वन भव्य प्रमाणात असल्याने अवैध वृक्षतोड लक्षात येत नाही. मात्र, वनोपज तस्करांनी पांढरी जंगली मुसळी, तिखाडी नावाचे सुगंधीत गवत व चंदनाची मौल्यवान झाडे मेळघाटातून हद्दपार केल्यावर आता तस्करांनी अवैध व अनैसर्गिक पद्धतीने सालई झाडांचा डिंक (गोंद)काढणे सुरू केल्याने सालईला पण धोका निर्माण झालेला आहे. मेळघाटातील सुसर्दा, बारातांडा, शिवाझिरी, रेल्वे धुळघाट, वान, रेल्वे तलई, भंवर, हिराबंबई, बिरोटी, पलसकुंडी, राणापिसा, लाक्टू, आंबाबारवा, सावलीखेडा, टेंभरूखेडा, गोलाईच्या जंगलात सालई डिंकाची झाडे मोठ्या प्रमाणात आजही जिवंत असली तरी मध्यप्रदेशातील इंजेक्शन फार्मूल्याने झाडांना धोका निर्माण होत आहे.

# चंद्रपूर महापालिकेत युतीचा नवा प्रयोग

**विदर्भ केसरी। चंद्रपूर :**

अखे रच्या क्षणापर्यंत उत्कंठा वाढलेल्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजप व शिव सेना उध्दव ठाकरे पक्षाने शेव टच्या मिनिटाला युती केली आणि म हापौर पद प्रत्येकी सव्वा स व्वा वर्ष भाजप व शिवसेना विभा गून घेईल असा 'लेखी करार' केला . या सर्व सोपस्कारानंतर झालेल्या निवडणुकीत महापौर पदी भाजपच्या संगीता खांडेकर अवघ्या एक मताने तर उपमहापौर पदी ठाकरे सेने चे प्रशांत दानव ईश्वर चिठ्ठीने विजयी झाले.

अवघे २ ४ नगरसेवकांचे सं ख्या ब ळ असतांना भाजप नेते माजी मंत्री आमदार सुधीर मुनंटीवार, आमदार किशोर जोरगेवार यांनी मुसद्देगिरीने ३२ नगरसेवकांची संख्या असतां ना आमदार विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या विकोपाला गेलेल्या भांडणाचा फायदा घेत पालिकेवर भाजपचा झेंडा फडकविला.

महापालिका निवडणुकांचे निकाल १६ जानेवारीला जाहिर झाले तेव्हापासून महापौर व उपमहापौर कोण ही चर्चा सर्वत्र सुरू होती. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत सर्वाधिक २७ नगरसेवक असलेल्या काँग्रेसवर खासदार प्रतिभा धानोरकर व आमदार विजय वडेट्टीवार यांच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे पराभवाची नामुष्की ओढवली

पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता महापौर व उपमहापौर पदासाठी विशेष सभा झाली. महापौर पदासाठी एकूण १० नामनिर्देशन पत्रे दाखल झाली होती. मात्र अन्य उमेदवारांनी नामनिर्देशन मागे घेतल्याने काँग्रेसच्या वैशाली महाडोळे व भाजपच्या संगीता राजेंद्र खांडेकर यांच्यात थेट लढत झाली. हात उंचावून मतदान घेण्यात आले असता वैशाली महाडोळे यांना ३१ तर संगीता खांडेकर यांना ३२ मते मिळाल्याने एका मताच्या फरकाने संगीता खांडेकर यांची महापौरपदी निवड झाली. उपमहापौर पदासाठी अपक्ष उमेदवार प्रशांत दानव, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे प्रदीप देशमुख यांच्यात लढत झाली. मतदानात दोघांनाही प्रत्येकी ३२ मते मिळाल्याने ईश्वरचिठ्ठी काढण्यात आली. त्यात अपक्ष उमेदवार प्रशांत दानव यांची उपमहापौरपदी निवड झाली.

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) पक्षाच्या एकमेव सदस्याने केवळ उपमहापौर पदासाठी मतदान केले असून महापौर पदासाठी तटस्थ भूमिका घेतली.

### काँग्रेसच्या हाती बाकी शून्य....

■ **सर्वाधिक २७ नगरसेवक निवडून आल्यानंतरही महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या हाती काहीच लागले नाही. ३२ नगरसेवकांचा पाठिंबा असतांनाही दोन नगरसेवकांची जुळवा जुळव काँग्रेस पक्षाला करता आली नाही. एमआयएमचा नगरसेवक देखील काँग्रेससोबत आघाडीत लढलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या गटात सहभागी झाला. मात्र काँग्रेसच्या वैशाली महाडोळे यांना मतदान करण्याऐवजी तटस्थ राहण्याची भूमिका घेतली.**

# घरगुती वापराच्या गॅसचा काळाबाजार, हिंगणातून १८० सिलेंडर जप्त

**विदर्भ केसरी। नागपूर:**



शहर हद्दीतील खडका शेत शिवारात अनुदानीत घरगुती वापराच्या सिलेंडरची साठेबाजी करणाऱ्या गोदामावर छापा टाकत पोलिसांनी बेकादेशीररित्या सुरू असलेला गोरखधंदा चव्हाट्यावर आणला. या गोदामातून पोलिसांनी घरगुती वापराचे अनुदानित १८० सिलेंडर जप्त करत साठेबाजीकरणाऱ्या पाच जणांच्या टोळीला जेरबंद केले.

गुन्हे शाखेच्या पथक एकने हिंगणा पोलीस हद्दीतील खडका येथील गोदामावर सोमवारी हा छापा टाकला. धक्कादायक बाब म्हणजे या गोदामातून घरगुती वापराच्या अनुदानीत गॅस सिलेंडरमधून वाय काढन घेत तो व्यावसायिक वापराच्या सिलेंडरमध्ये भरला जात होता. सहा ते सात जणांच्या टोळीतील तीघेजण हे राजस्थानमधील रहिवासी आहेत. या टोळीला मानेवाडातील भवानी गॅस एजन्सीतून घरगुती वापराचे गॅस सिलेंडर व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडमध्ये भरण्यासाठी पुरवला जात होता.

हबीब गुलाम शेख याच्या मालकीच्या या शेतातील गोदामात एका पत्र्याच्या शेडमध्ये या टोळीने बेकायदेशीर कृत्य सुरू केले होते. गोदामावर छापा टाकला त्यावेळी सुनिलकुमार हजमानाराम जानी (४२), प्रकाश बुधाराम खिल्लेरी (२३), श्रवणकुमार राजुराम जानी, तिघेही रा. पल्ली ता.लोहावट जि जोधपूर, राजस्थान, हबीब गुलाम शेख आणि भवानी गॅस एजन्सीचा मालक अशा पाच जणांना पोलिसांनी अटक केली.

दैंनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ | २

## अग्रलेख

# ती वेळ आलीच !

जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते,की आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे. त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते, ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा. मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणजेच महापौर पदासाठी शनिवारी भाजपतर्फे अर्ज भरण्यात आला. मुंबईच्या प्रथम नागरिक म्हणून रितू तावडे यांचे नाव निश्चित झाले. विरोधी पक्षातर्फे कोणाचेही नाव निश्चित न झाल्याने आता बुधवारी रितू तावडे या महापौर बनणार हे निश्चित. म्हणजे आता मुंबई महानगरपालिकेचा कारभार पुन्हा पाच वर्षांनी का होईना सुरू होणार हे महत्त्वाचे. त्याचप्रमाणे इतर समित्यांचेही अध्यक्ष ठरतील आणि मुंबईकरांच्या समस्यांना कोणीतरी वाली निर्माण होईल व समस्या सुटतील अशी अपेक्षा धरायला हरकत नाही. एकदा का वैधानिक समित्या सुरू झाल्या, की पालिकेचे कामकाज सुरळीतपणे सुरू होईल. पाच वर्षे हीच सत्ता अधिकाऱ्यांच्या हातात होती. भले राज्यातील सत्ताधारी यावर नियंत्रण ठेवून होते मात्र काही प्रमाणात पालिका अधिकाऱ्यांची मनमानी एकाधिकार शाही सुरू होती, त्यावर आता चाप बसेल व अंकुश ठेवणे सोपे जाईल कारण आता खरेखुरे ट्रस्टी खऱ्या अर्थाने जनतेने निवडून दिलेले सेवक म्हणजेच नगरसेवक यांचा यावर अधिपथ्य स्थापन होईल आणि अशी अपेक्षा जनतेची असेल. जनतेची फक्त थोडीफार अपेक्षा असते आपल्या विभागातील सुख सुविधा आपल्या नगरसेवकांपुढे ठेवणे किंवा नवीन सुविधा निर्माण करणे, मग त्यात पाणीपुरवठा, गटारे, उद्याने, रस्ते, पदपथ, वाहतूक सारख्या तत्सम गोष्टी सुरळीत ठेवणे व लोकाभिमुख असणे हेच व त्यामुळे नागरिकांना सुखाचे जीवन जगता येणे एवढीच अपेक्षा असते,ती नगरसेवकांच्या मार्फत पूर्ण होते. आता ती पूर्ण होईल अशी नागरिकांची अपेक्षा. मुंबईचे महापौर या पदावर स्थानापन्न झाल्यावर लगेच स्थायी समिती, आरोग्य समिती, बेस्ट समिती यासारख्या समित्याही लवकरच स्थापना केल्या जातील व त्यांचे अध्यक्ष घोषित होतील. मुंबई महानगरपालिकेचे सध्या सर्व आलबेल चालले असले, तरी मुंबई महानगरपालिकेच्या एक अविभाज्य अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाची मात्र सध्या अवस्था बिकट झाली आहे. एक चांगला उपक्रम प्रशासनावरच्या व राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षपणामुळे कशाप्रकारे मोडीस निघतो याचे उदाहरण म्हणजे बेस्ट उपक्रम. आज मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. निदान कर्मचाऱ्यांचे वेतन तरी वेळेवर होते. मात्र त्याच दुसरीकडे बेस्ट उपक्रमाकडे वेतन द्यायलाही महिना अखेर पैसे उपलब्ध होत नाही. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वेतनावर प्रचंड पैसा खर्च होतो. म्हणून पालिकेच्या दबावाने बेस्टवर खाजगीकरण मोठ्या प्रमाणात लादले गेले. मात्र दुसरीकडे मात्र पालिकेचे खाजगीकरण त्या प्रमाणात होऊ शकले नाही. मात्र बेस्ट उपक्रमात बेस्ट कर्मचारी बस गाड्यांपासून इतर सर्व गोष्टी कंत्राटदारांमार्फत मुंबईकरांवर लादल्या गेल्या.आज त्याचाच परिणाम म्हणजे कंत्राटीकरण झालेल्या बेस्ट बस गाड्यांमुळे प्रवाशांनाच मोठ्या प्रमाणावर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बेस्ट बस गाड्यांची संख्या कमी झाली, नवीन बस वेळेवर येत नाही, रस्त्यावरील बस गाड्यांची संख्या कमी झाल्यामुळे प्रवाशांची संख्या कमी झाली, बस गाड्यांवर काम करण्यास कंत्राटदारांना अपुऱ्या वेतनामुळे कर्मचारी मिळत नाही, त्यामुळे प्रवासी घटले व बेस्टचे उत्पन्नही घटले. खरंच खाजगीकरणामुळे बेस्ट उपक्रम फायद्यात येऊ शकेल का? मात्र त्याचे उत्तर अजूनही नाही असेच म्हणावे लागेल. कारण ज्या मोठ्या प्रमाणावर बेस्टला तोटा होत होता तो कमी करण्यासाठी खाजगीकरण आणले गेले असे समर्पक उत्तर मिळते. मात्र एकेकाळी दोन ते तीन हजार करोडचा निव्वळ तोटा असलेला बेस्ट उपक्रम आज तब्बल १३ ते १४ हजार करोड तोट्यात गेला. आतापर्यंत मुंबई महानगरपालिकेने बेस्ट प्रकरणास आपली पालक संस्था म्हणून आठ ते नऊ हजार करोड रुपये दिलेत. त्यामुळे बेस्ट उपकरणाचा तोटा काही अंशी भरून निघत आहे. मात्र आता मुंबई महानगरपालिकेनेही हात वरती केला असून बेस्ट उपक्रम लवकरच सुधारला नाही तर यापुढे मदत मिळणार नाही असे फर्मान सोडले आहे. त्यामुळे बेस्ट प्रकरणाची अवस्था अजूनच बिकट झाली आहे. तर दुसरीकडे बेस्ट उपक्रमांमधून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची अवस्था ही अत्यंत बिकट झाली. आज कित्येक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे, तर कित्येक कर्मचारी अजूनही दडपणाखाली आहेत. त्यांना त्यांच्या मुलांची लग्न करणे कठीण होऊन बसले आहे. तर किती कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे शिक्षण थांबले आहे. दर दोन ते तीन महिन्यांनी विविध संघटनांच्याखाली बेस्टच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना आंदोलने व उपोषण करावी लागत आहे. मध्यंतरी बेस्ट उपक्रमाने बस भाडेवाढ केली मात्र भाड्याने घेतलेल्या बस गाड्यांच्या कंत्राटदारांचे पैसे प्रथम अदा केले जातात मग राहिलेल्या पैशातून बेस्ट उपक्रमाचा दैनंदिन गाडा हाकला जातो. मग ते त्यातून काहीच नाही मग बेस्ट निवृत्त कर्मचाऱ्यांचे पैसे कसे अदा करणार? बेस्ट उपक्रमाचे गंगाजळी आज पूर्णपणे रिती झाली आहे. आज महापौर बसला तर उद्या बेस्ट समिती स्थापन होईल. बहुतेक बेस्ट समिती शिंदे गटाला मिळण्याची दाट शक्यता आहे. मात्र खाजगीकरणामुळे आज बेस्टमध्ये तसे विशेष काही राहिलेले नाही. आज मात्र तोट्यातून बाहेर येण्यासाठी बेस्ट उपक्रम मोक्याचे भूखंड बस आगारे, बस स्थानके, विद्युत संग्रह केंद्रे यांच्या जागेचा व्यावसायिक वापर करून बेस्ट उपक्रम फायद्यात येईल अशी अपेक्षा आहे.

# नांदगावच्या नगराध्यक्षांनी शपथविधीच्या दिवशीच जनता दरबार घेऊन स्वीकारला पदभार

## १०७ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे पत्र वाटप : ४८७ जनता दरबारात तक्रारी प्राप्त

**विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर/अमोल धवसे**



नगर पंचायतच्या थेट जनतेतून प्रथम महिला नगराध्यक्षा निवडून आलेल्या सौ. प्राप्ती मारोटकर यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन करून आगळा वेगळा पदभार स्वीकारला यावेळी ४८७ नागरिकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात नगराध्यक्ष यांच्याकडे सादर केल्या आणि १०७ लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम परवानगी वाटप करण्यात आल्या. शेकडो नागरिकांनी जनता दरबाराला गर्दी केली होती.

नांदगाव नगर पंचायतच्या इतिहासात असा खुला जनता दरबार अधिकाऱ्यांस समक्ष आयोजित करण्याची ही पहिलीच वेळ असून नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारतात जनहितासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलून शपथविधीच्या दिवशीच जनता दरबार हाच आमचा पदभार असा संदेश देत जनता दरबाराचे आयोजन करून त्यात ४८७ नागरिकांनी आपल्या तक्रारी यावेळी मांडल्या यामध्ये शहरातील नाले, साफ-सफाई, दैनंदिन स्वच्छता, पाणी पुरवठा, पथदिवे, घरकुल अशा अनेक मूलभूत समस्या लेखी स्वरूपात मांडल्या त्यात काही समस्या तात्काळ सोडविण्यात तर काही समस्या काही दिवसात सोडविण्यात येणार असून भोगवटा धारकांना शासन स्तरावर पाठपुरावा करून जागेचा पट्टा देऊन आठ-अ नोंद करून घरकुलाचा लाभ चार महिन्यात देणार असल्याचे नगराध्यक्ष सौ. प्राप्ती मारोटकर यांनी जनता दरबारात नागरिकांना सांगितले तर मालकीची जागा असणाऱ्या १०७ लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम परवानगी देण्यात आली तसेच बांधकाम शुल्क पाच हजार रुपये यावेळी लाभार्थ्यांना माफ करण्यात आले.

यावेळी शेकडो नागरिक महिलांनी आपल्या समस्या आयोजित जनता दरबारात मांडल्या यावेळी नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर, उपनगराध्यक्ष शेख जमिर, पाणीपुरवठा सभापती वासुदेव लोखंडे, बांधकाम सभापती मो. रियाज, स्वच्छता सभापती सौ.ज्योत्सना धवसे, महिला बालकल्याण सभापती कांता लोमटे, उपसभापती शिला वाडेकर नगरसेवक सर्व मो. साजिद, प्रकाश मरोटकर, आयेशा शेख, रजियाबी, अलमास बी, सौ. प्रांजली गुल्हाने, सौ. प्रिती इखार, मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांच्यासह न.पं. कर्मचारी उपस्थित होते.

**नगराध्यक्ष कक्षाचा खर्च करणार स्वतः**

काही दिवसापूर्वी विरोधी गटातील नगरसेवकांनी नगराध्यक्षांच्या कॅबिनवर लाखो रुपयांचा खर्च करून रंगरंगोटी करीत असून नगराध्यक्ष जनतेच्या पैशाची उधळण करीत असल्याचा आरोप केला होता त्यावर नगराध्यक्षांनी स्पष्टीकरण देत माझ्या कॅबिनचा खर्च मी स्वतः करणार असल्याची जनता दरबारात उपस्थितान समोर त्यावेळी जाहीर केले आणि यापूर्वीच तसे पत्र सुद्धा मुख्याधिकाऱ्यांना दिले असल्याचे मत नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर यांनी व्यक्त केले.

# अवघ्या बारा तासांत अल्पवयीन मुलीचा शोध

**विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा**

चांदुर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथून बेपत्ता झालेल्या एका अल्पवयीन मुलीचा अवघ्या बारा तासांच्या आत शोध घेऊन तिला सुरक्षितपणे नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात शिरजगाव कसबा पोलिसांना यश आले आहे. या तत्पर आणि संवेदनशील कारवाईमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी अचानक घरातून निघून गेल्याची तक्रार नातेवाईकांनी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात दिली होती. तक्रार मिळताच पोलिसांनी तात्काळ गंभीर दखल घेत शोधमोहीम सुरू केली. संभाव्य ठिकाणी चौकशी, तांत्रिक माहितीचा वापर आणि गोपनीय सूत्रांच्या मदतीने पोलिसांनी अत्यंत कमी वेळेत मुलीचा ठावठिकाणा शोधून काढला. पोलिसांनी मुलीला सुखरूप ताब्यात घेऊन तिची विचारपूस केली असता ती सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तिला नातेवाईकांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले. या संपूर्ण कारवाईत शिरजगाव कसबा पोलिसांनी दाखवलेली तत्परता, सतर्कता आणि मानवी दृष्टिकोन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस दल किती सज्ज आहे, याचे उत्तम उदाहरण ठरत आहे. परिसरातील नागरिकांनीही पोलिसांच्या या दमदार कामगिरीचे मनापासून अभिनंदन केले आहे.

# हरदोली पुनर्वसनातील नागरिक सुविधांसाठी ग्रामस्थांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

### मूलभूत सोयी तात्काळ पूर्ण करण्याची मागणी

**विदर्भ केसरी। राजहंस शेंडे प्रतिनिधी**

कुही तालुक्यातील मौजा हरदोली (बोरी नाईक-२) येथील पुनर्वसन वसाहतीत अद्याप अनेक मूलभूत नागरी सुविधा अपूर्ण असल्याने ग्रामस्थांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. सामाजिक कार्यकर्ते सौ. सरला संजीव बारई आणि श्री. संजीव सोमाजी बारई यांच्या पुढाकाराने हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केल्यानुसार, पुनर्वसनांतर्गत सर्व रस्ते सिमेंटचे करणे, गावातील नाल्यांचे उंचीकरण व बांधकाम, सांडपाणी व्यवस्थेची योग्य सोय तसेच सांडपाणी बाहेर जाण्यासाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे अत्यावश्यक आहे. लोकवस्तीच्या दृष्टीने मैदानाचे सपाटीकरण करून त्याचे सुशोभीकरण करणे, अंगणवाडी इमारतीची दुरुस्ती अथवा नवीन बांधकाम करणे, तसेच माता-बाल संगोपन केंद्रासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. आरोग्य सेवांसाठी केंद्रात एमबीबीएस डॉक्टर व आवश्यक परिचारिका नियुक्त कराव्यात, जिल्हा परिषद शाळा डिजिटल करून परिसर सुरक्षित करावा, तसेच बोरी नाईक-२ ते हरदोली पुनर्वसन दरम्यानचा रस्ता तातडीने बांधावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

स्मशानभूमीचे सुशोभीकरण, ग्रामपंचायतीच्या प्रलंबित निवडणुका तात्काळ घेणे आणि सुमारे ६०० मीटर रस्त्याचे काम पूर्ण करणे यावरही भर देण्यात आला आहे. जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे अपूर्ण असल्याने तयार करण्यात आलेली बोअरवेल निष्प्रभ ठरत आहे. त्यामुळे पर्यायी जलव्यवस्था करावी, तसेच पिण्याच्या पाण्यासाठी तयार विहिरीची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांना नियमानुसार आर्थिक मदत देणे, उर्वरित पात्र कुटुंबांना पुनर्वसनाचा लाभ मिळवून देणे आणि पुनर्वसन वसाहतीतील सर्व सुविधा दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने त्वरित लक्ष घालावे, अशी एकमुखी मागणी हरदोलीतील नागरिकांनी केली आहे.

# पुतळ्याची विटंबना करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करा

**विदर्भ केसरी।**



**यवतमाळ :** तेलंगणा राज्यामध्ये संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्हापुर गावामध्ये सामाजिक शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याची 7 फेब्रुवारी 2026 रोजी समाजकंटकांद्वारे अवहेलना करण्यात आली हे कृत्य अतिशय निंदनीय आहे. सरकारने दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने मंगळवारी (ता.१०) जिल्हाधिकारी यांच्यामार्फत गृहमंत्री अमित शहा यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

यावर तेलंगणा सरकारने लक्ष घालून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे निवेदन यावेळी भारताचे केंद्रीय गृहमंत्री नामदार अमितजी शहा यांना जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे मार्फत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष सौ सुनयना संजय येवतकर (अजात), अबोली देशमुख, संध्या वानखेडे, ममता गवारगुरु , वंदना कानंदे ,शीतल घावडे, सुधा खडके, मोहन लोखंडे, मनोज पाचघरे, शशांक केंडे, भाविक ठक, वैशाली दाभेरे, सपना घावडे,मनोज भबुतकर, करूना भबुतकर इत्यादी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाहनाची बॅटरी चोरणारे जेरबंद

**विदर्भ केसरी।यवतमाळ :**



यवतमाळ जिल्हा आणि परिसरात चारचाकी वाहनांच्या बॅटरी चोरणाऱ्या एका टोळीला गजाआड करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला (LCB) यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून २० नग बॅटरी आणि गुन्ह्यात वापरलेली ॲपे असा एकूण २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शेख रब्बु शेख नवाज (२६): रा. डेहणी (ता. दिग्रस), सध्या रा. यवतमाळ (चालक), परमेश्वर सुनील राठोड (२५) रा. सिंदखेड (ता. नेर), साहिल शंकरराव खवास (२१): रा. अशोक नगर (ता. नेर) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

९ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गुन्हेगारांच्या शोधात पेट्रोलिंग करत असताना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, परमेश्वर राठोड (रा. सिंदखेड) हा त्याच्या साथीदारांसह दारव्हा आणि यवतमाळ परिसरातून चोरलेल्या बॅटरी एका ॲपे रिक्षात (क्र. MH-29-BD-1689) भरून विक्रीसाठी नेणार आहे. या माहितीच्या आधारे पथकाने पोबारू ले-आऊट परिसरात सापळा रचला व आरोपींना ताब्यात घेतले. आरोपीकडून २० नग बॅटरी विविध वाहनांच्या (किंमत ६५,००० रुपये)., ॲपे रिक्षा वाहन (क्र. MH-29-BD-1689) (किंमत १,५०,००० रुपये) असा एकूण किंमत: २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, एलसीबीचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पवन राठोड, बबलू चव्हाण, मिथुन जाधव, सोहेल मिर्झा, किशोर झेंडेकर, पवन ढवळे, अमित झेंडेकर, जितेंद्र चौधरी आणि कविश पालेकर यांनी पार पाडली.

# मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

### तात्काळ कारवाईची मागणी

**विदर्भ केसरी। यवतमाळ | प्रतिनिधी**



शहरातील वडगाव रोड परिसरातील सहकारनगर, महादेवनगर, राणाप्रताप नगर आणि आसपासच्या भागात मोकाट कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या भागात अबालवृद्धांवर सातत्याने हल्ले होत असून दररोज दोन ते तीन नागरिकांना कुत्रे चावत असल्याच्या घटना समोर येत आहेत. परिणामी अनेकांना दुखापत होत असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

आज घडलेल्या एका गंभीर घटनेत निवृत्त शिक्षिका अंजली चौधरी यांच्यावर गुलशन प्रोव्हिजन दुकानाजवळ, तसेच नगराध्यक्षांच्या निवासस्थानाजवळ मोकाट कुत्र्यांनी अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. भोवळ आल्याने स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

गेल्या काही दिवसांपासून अशा घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांना रस्त्यावरून चालणेही धोकादायक बनले आहे. विशेषतः लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून शाळेत जाणारी मुले व रहिवासी घराबाहेर पडताना घाबरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर परिसरातील नागरिकांनी यवतमाळ नगरपालिकेकडे मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. संबंधित विभागाने या समस्येची गंभीर दखल घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियदर्शिनी उईके यांच्या निवासस्थानाजवळच ही घटना घडल्याने नगरपालिकेने तातडीने लक्ष घालून प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# तडीपार आरोपीला अटक

**विदर्भ केसरी। उमरखेड :**



गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यात सक्रिय असलेल्या आरोपीला एक वर्षासाठी चार जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले. मात्र तडीपारीचा आदेश असूनही संबंधित आरोपी स्वत:च्या गावातच दडून बसला होता. ही बाब निदर्शनास येताच मंगळवारी (दि. १०) एलसीबी पथकाने त्याला पुन्हा पकडून त्याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल केला आहे.

रितेश महेंद्र तिवारी रा. विडूळ ता. उमरखेड असे या तडीपार आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध गेल्या वर्षी २ एप्रिल २०२५ रोजी तडीपारीचा आदेश बजावण्यात आला होता. रितेशला यवतमाळसह नांदेड, हिंगोली, वाशीम या चार जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले होते. मात्र तो पोलिसांना गुंगारा देऊन आपल्याच गावात वास्तव्य करीत असल्याचे गंभीर वास्तव पुढे आले. १० फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरखेड उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना रितेशबाबत गुप्त माहिती मिळाली. त्यावरुन पथकाने विडूळ ते ढाणकी रोडवरील हरदडा परिसरातील विरु ढाबा येथून रितेशच्या मुसक्या आवळल्या. तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्या प्रकरणी रितेश तिवारी याच्याविरुद्ध कलम २२३ भान्यासं सहकलम १४२ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच पुढील कारवाईसाठी त्याला उमरखेड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड, एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश चावरे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक धीरज बांडे, शरद लोहकरे, मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, सुनील पंडागळे, रवींद्र शिरामे, राजेश जाधव आदींचा समावेश असलेल्या पथकाने पार पाडली.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे.
(या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,
Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## एसटी कर्मचाऱ्यांनी पुन्हा दिला आंदोलनाचा इशारा

■ 'राज्यातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून आलेल्या रकमेबरोबर वाढीव वेतनाचा फरक देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, संबंधित रक्कम न दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. मंगळवार १० फेब्रुवारीपर्यंत वाढीव वेतनाचा फरक न दिल्यास रीतसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन केले जाईल,' असा इशारा महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार यांनी दिला आहे.

# उद्योजकता, रोजगार व सर्वधर्मीय एकात्मतेचा प्रभावी संदेश

## माजी आमदार कीर्ती गांधी : यवतमाळात जैन बिझनेस कार्निवल 2026 यशस्वीरीत्या संपन्न

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



उद्योजकता, नवकल्पना आणि व्यापाराच्या नव्या संधींचा संगम साधणारे भव्य जैन बिझनेस कार्निवल – 2026 यवतमाळ शहरात मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडले. जोश फाउंडेशन, यवतमाळ यांच्या वतीने समता मैदान, यवतमाळ येथे 6 ते 9 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या चार दिवसीय कार्निवलला उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी व नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. या कार्निवलमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील आकर्षक स्टॉल्स, उत्पादन व सेवांचे सादरीकरण, नेटवर्किंग सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन तसेच स्थानिक व्यवसायांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रभावी प्रयत्न करण्यात आला. नवोदित उद्योजकांना व्यवसायाच्या संधी, मार्गदर्शन व संपर्क मिळण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरले. व्यवसायासोबतच मनोरंजनालाही विशेष महत्त्व देण्यात आले होते. लाईव्ह ऑर्केस्ट्रा, लहान मुलांसाठी खेळणी तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स ही कार्निवलची प्रमुख आकर्षणे ठरली. त्यामुळे कुटुंबासह आलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती नोंदवली. समारोप सोहळा उत्साहात कार्निवलचा समारोप सोहळा 9 फेब्रुवारी रोजी रात्री 8 वाजता पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार कीर्ती बाबू गांधी होते. यावेळी जैन सेवा समितीचे अध्यक्ष महावीर भंसाली, यवतमाळ जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. संजय जैन, महावीर फाउंडेशनचे अध्यक्ष विजयकुमार बुंदेला, गुजराती समाजाचे अध्यक्ष चेतनभाई पारेख, श्वेतांबर मूर्तीपूजक श्री संघाचे लहरभाई नागडा, महाराष्ट्र प्रदेश मानव अधिकार संघटनेचे राज्य अध्यक्ष इरफान मलनस, जैन कार्निवल 2026 चे प्रकल्प अधिकारी प्रज्योत कांकरिया, जोश फाउंडेशनच्या उपाध्यक्ष सीमा तातेड, सौ. चंदा कोटेचा, युवा समितीचे अध्यक्ष श्याम भंसाली आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार कीर्तीबाबू गांधी यांनी जोश फाउंडेशनच्या या सर्वधर्मीय व समाजोपयोगी उपक्रमाचे मुक्तकंठाने कौतुक केले. अशा आयोजनांतून शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यवसाय, लघुउद्योग व रोजगाराच्या संधींबाबत उपयुक्त माहिती मिळते आणि यवतमाळसारख्या शहराला आर्थिकदृष्ट्या नवी दिशा मिळते, असे त्यांनी नमूद केले. यावेळी ॲड. संजय जैन यांनी जोश फाउंडेशनच्या सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांना भविष्यातही तन-मन-धनाने सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रज्योत कांकरिया यांनी केले. सूत्रसंचालन सौ. आरती खिवसरा यांनी केले, तर आभार प्रदर्शन सम्यक सुराणा व उमेश बैद यांनी केले. यशस्वी आयोजनाबद्दल जोश फाउंडेशनचे अध्यक्ष गौरव/शुभम खिवसरा व संपूर्ण जोश टीमचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. जैन बिझनेस कार्निवल 2026 ने यवतमाळमध्ये उद्योजकतेची नवी ऊर्जा निर्माण केली असून, भविष्यात अशा उपक्रमांची गरज अधिक असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम खिवसरा, प्रजोत कांकरिया ईशान बोथरा, उमेश बैद. राजेश गुगलीया, हर्ष बोरा, जयेश बोरा, वृषभ बोरा, मोहित सुराणा, अर्पित बोरा, गौरव गुगलीया, सम्यक सुरणा, सुनय ओसवाल, दीपेश बोरा, नवीन कोठारी, हर्ष भरुट, पराग बंब, राहुल बोरा, पियुष झांबड, सुयश बोरा, मंगलेश गादिया, जिनेश कर्णावट , चिराग पिपरिया, ओजस बरलोटा, वर्षा तातेड, वंदना बोरुंदिया, आरती खिवसरा, मीनल बोरा, योगिता बरलोटा, रानू झांबड, भार्गवी दर्डा, ममता बोरा, योगिता बरलोटा, साक्षी खिवसरा,समीक्षा अलिझार, हर्षिता कुचेरिया, पलक झांबड, खुशी कोठारी, सह जोश फाऊंडेशनचे असंख्य पदाधिकारी प्रयत्नशील होते

## महत्त्वाचे



### श्री. बाबुसिंग चव्हाण मूकबधीर निवासी विद्यालय खेळाडूंची राज्यस्तरावर भरारी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**

यवतमाळ दि 10 फेब्रुवारी :-महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय व जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या सैयुक्त विधमानाने जिल्हास्तरीय शालेय दिव्यांग मुलं मुलीच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा 2025-26 च्या क्रीडा स्पर्धेत मोहदा येथील मनोहर नाईक शिक्षण संस्था अंतर्गत श्री बाबुसिंग चव्हाण मूकबधिर विद्यालय च्या दिव्यांग क्रीडा पटूनी जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत गोल्ड मेडल व सिल्वर मेडल पटकावून राज्य स्तरावर आपली पात्रता सिद्ध करून भरारी घेतली. सोळा ते एकवीस वयोगटातील 200 मिटर धावणे स्पर्धेत समीक्षा वामन आत्राम हिने गोल्ड मेडल तर गोळा फेक मध्ये कास्य मेडल प्राप्त केले तर मुलाच्या 200 मिटर धावणे स्पर्धेत संतोष अंजीकर यांनी सिल्वर मेडल प्राप्त केले. सांस्कृतिक स्पर्धेत शिवानी राऊत हिने कास्य मेडल पटकावून आगामी होत असलेल्या राज्यस्तरीय शालेय दिव्यांग मुलं मुली क्रीडा स्पर्धेतकरीता भरारी घेतली. दिव्यांग क्रीडापटूनी आपल्या यशाचे श्रेय जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारीधिकारी मंदार पत्की, अतिरिक्त मुख्य कार्यकारीधिकारी संतोष धोत्रे, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मंगला मुन, संस्थेचे, पदाधिकारी, मुख्याध्यापक, शारीरिक शिक्षण शिक्षक व क्रीडा शिक्षक, शिक्षक शिक्षकतेर कर्मचारी वृंद यांना दिले. सर्वांनी या खेळाडूचा विशेष गौरव करून सत्कार केला.



### विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची:मंत्री डॉ. अशोक उईके

**▸विदर्भ केसरी।**

विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवण्यामध्ये आईवडिलानंतर सर्वात महत्वाची भूमिका कुणाची असे तर ती शिक्षकांची भूमिका आहे. त्यामुळे आईवडिलीनंतर मुलांचा दुसरा गुरू कुणी असले तर तो शिक्षकच असतो. येथील नावाजलेल्या शिवाजी शिक्षण संस्थेने अजवर राज्याला अनेक मौल्यवान विद्यार्थ्यांच्या रुपाने रत्ने दिली असून, ही परंपरा आजही कायम आहे, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री ना. डॉ. अशोक उईके यांनी घारफळ येथे केले. शनिवारी ७ फेब्रुवारी रोजी स्व. रा. जा. उपाख्य बाबासाहेब घारफळकर स्मृती प्रवेशद्वार व शुद्ध पेयजल कुंभ उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिलीप इंगोले, मुख्याध्यापक मनोज येडे, पद्मश्री सुभाष पाळेकर, हेमंत काळमेघ, जयंत पुसदेकर, वसंत घुईखेडकर, बाबुपाटील जैत, केशव मेटकर, अशोक देशमुख, भैयासाहेब पावडे, मधुकर बोबडे, विनोद कडू, कृष्णराव कडू, प्रणय घारफळकर, निमाने, ओम राठी, प्रकाश भुमकाळे, आशिष सोळंके, तहसीलदार मीरा पागोरे, पोलिस निरीक्षक दिपमाला भेंडे, अनिकेत पोहोकार, महादेव गर्जे आदींची उपस्थिती होती. स्वागताध्यक्ष अशोकराव घारफळकर होते. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत बाभूळगावच्या ग्रामपंचायतीस तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मुख्याध्यापक मनोज येडे यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. स्व. बाबासाहेब घारफळकर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. स्वागताध्यक्ष अशोकराव घारफळकर यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली. प्रास्ताविक मनोज येडे यांनी केले, सूत्रसंचालन सुनील कडू यांनी तर कृष्णराव कडू यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरीक, महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले



# जिल्ह्यात महारेशीम अभियानाचा शुभारंभ

**▸विदर्भ केसरी।**

जिल्हाधिकारी आशिष येरेकार यांच्या हस्ते सोमवारी महारेशीम अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रेशीम रथाला हिरवी झेंडी दाखविली. तसेच रेशीम उद्योगाची माहिती जाणून घेतली.

सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यात एकूण ८०० एकर क्षेत्रावर रेशीम शेती लागवडीचे उद्दीष्ट आहे. यात कृषि विभागातर्फे ३०० एकर, रेशीमतर्फे विभाग २५० एकर, आणि जिल्हा परिषदेतर्फे २५० एकर रेशीम लागवड करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी जून २०२६ मध्ये तुती लागवडीसाठी ४ फेब्रुवारी ते ५ मार्चपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी आपले सरकार पोर्टलवरून ऑनलाईन पद्धतीने करून त्याची प्रत जिल्हा रेशीम कार्यालयात जमा करावी लागणार आहे. यासाठी प्रति एकर ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे.

# विदर्भातील भव्य रक्तदान शिबिराच्या प्रचाराचा शुभारंभ उत्साहात संपन्न....

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ,दि.९ फेब्रुवारी... विदर्भातील सर्वाधिक मोठ्या रक्तदान शिबिराच्या प्रचाराचा शुभारंभ आज दिनांक ९ फेब्रुवारी (सोमवार) रोजी दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी डॉ.अर्चनाताई गाडे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग येथे उत्साहात पार पडला.सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व संभाजी ब्रिगेड यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिराच्या प्रचारासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रा.पंढरी पाठे यांनी उपस्थितांना संबोधित करताना रक्तदान हे केवळ दान नसून एक सामाजिक चळवळ असल्याचे प्रतिपादन केले. समाजातील रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा नेहमीच जाणवत असून,ही गरज भागवण्यासाठी युवकांचा,विशेषतः मेडिकल व नर्सिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.येणाऱ्या १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन या चळवळीला बळ द्यावे,असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी डॉ.अर्चनाताई गाडे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे संचालक सन्माननीय गाडे पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात मेडिकल व नर्सिंग फॅकल्टीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. समाजोपयोगी उपक्रमांमध्ये युवकांचा उत्स्फूर्त सहभाग ही सकारात्मक बाब असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. हे रक्तदान शिबिर दिनांक १९ फेब्रुवारी रोजी,सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व संभाजी ब्रिगेड यवतमाळ यांच्या माध्यमातून शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर,गार्डन रोड,यवतमाळ येथे सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या उपक्रमासाठी प्रकल्प प्रमुख अभिलाष खंडारे,कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर,गौरीनंदन कन्नाके,प्रा. पंढरी पाठे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे तसेच डॉ.अर्चनाताई गाडे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे संचालक सन्माननीय गाडे पाटील सर यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले."रक्तदान करा—जीवन वाचवा" या संदेशासह अधिकाधिक नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले

# टिपेश्वर ESZ प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची पायमल्ली

## संयुक्त उच्चस्तरीय चौकशी करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा -:**



केळापूर तालुक्यातील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यालगतच्या इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रात कथितरित्या व्यावसायिक बांधकामे, रिसॉर्ट उभारणी, खदानी उत्खनन व वृक्षतोड होत असल्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून या संदर्भात जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल करण्यात आली आहे. ही तक्रार अंकित नैताम जिल्हा उपाध्यक्ष, यवतमाळ जिल्हा ट्रायबल फोरम व संचालक, पर्यावरण स्वास्थ संस्था यांनी केली असून त्यांनी वन विभाग, महसूल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) व संबंधित प्राधिकरणांची संयक्त समिति नेमून तात्काळ प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, केंद्र शासनाची दिनांक 17 जानेवारी 2016 ची इको सेन्सिटिव्ह झोन अधिसूचना तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक 3 जून 2022 चा आदेशानुसार संरक्षित क्षेत्राभोवती किमान 1 कि.मी. परिसरात नवीन कायमस्वरूपी बांधकामांवर निर्बंध आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकल्पांना आवश्यक पर्यावरणीय व वैधानिक परवानग्या आहेत का, याची सखोल पडताळणी होणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. टिपेश्वर परिसर हा आदिवासी बहुल असून अनेक शेतजमिनी अभयारण्यालगत आहेत. वन्यप्राण्यांच्या वाढत्या संचारामुळे शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान व शेतीतील अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे स्थानिकांनी व्यक्त केले आहे. तार फेन्सिंगसारख्या संरक्षणात्मक उपाययोजनांची अपुरी अंमलबजावणीही चिंतेचा विषय ठरत आहे. अशा परिस्थितीत अभयारण्य प्रवेशद्वारालगत व्यावसायिक प्रकल्प विकसित होत असल्याच्या चर्चेमुळे पर्यावरणीय संतुलन व स्थानिकांच्या हिताबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

### कायद्याच्या चौकटीतच विकास व्हावा – अंकित नैताम

**■ या संदर्भात अंकित नैताम यांनी म्हटले आहे की, "टिपेश्वर अभयारण्य हे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील क्षेत्र आहे. विकास आवश्यक असला तरी तो पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986, वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या चौकटीतच व्हावा. संयुक्त चौकशीद्वारे वस्तुस्थिती स्पष्ट करून अनियमितता आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी."**

### प्रशासन व लोकप्रतिनिधींची भूमिका निर्णायक

**■ या गंभीर प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी, तसेच संबंधित सर्व लोकप्रतिनिधींनीही सार्वजनिक हिताच्या दृष्टीने भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. टिपेश्वर प्रकरण हे केवळ एका अभयारण्यापुरते मर्यादित नसून पर्यावरण, आदिवासी हक्क आणि शाश्वत विकास यांच्यातील संतुलनाचा व्यापक प्रश्न असल्याने राज्यस्तरावर याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.**



# जिल्हास्तरीय स्पर्धेत वालतूर तांबडे शाळा ठरली उपचॅम्पियन

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

जिल्हा परिषद यवतमाळ खेळ, क्रीडा व कला संवर्धन मंडळ यांच्या विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 05 फेब्रुवारी ते 07 फेब्रुवारी 2026 जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ येथे आयोजन करण्यात आले होते. यवतमाळ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा वालतुर तांबडे या शाळेने वयोगट 6 ते 11 व 11 ते 14 या वयोगटात उपचॅम्पियनशिप मिळवली. सलग दुसऱ्या वर्षी जिल्हास्तरीय उपचॅम्पियनशिप मिळवून वालतुर तांबडे या शाळेने इतिहास घडवला.

वयोगट 6 ते 11 खो खो खेळात मुली विजयी ठरल्या. 4×100 रिले या धावण्याच्या स्पर्धेत मुली विजयी ठरल्या. लांब उडी स्पर्धेत कुमारी परिदी गव्हाळे द्वितीय आली.

वयोगट 11 ते 14 खो खो या खेळात मुले उपविजेते ठरले. 4×100 रेले प्रकारात मुले प्रथम व मुली द्वितीय आल्या. 100 मीटर धावण्याच्या स्पर्धेत चाहत जाधव प्रथम. 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत आराध्या गव्हाळे द्वितीय. लांब उडी भावेश राठोड द्वितीय.थाळीफेक मध्ये आर्यन राठोड प्रथम आला.

त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मधुकर मोरझडे, शिक्षक भारत राठोड,विकास वाकडे, प्रफुल्ल पांडे,जयसिंग चव्हाण, रोहिदास पवार,श्रीराम आढाव, संभाजी हंगरगे,विक्रम राठोड यांनी अभिनंदन केले. तसेच सहाय्यक गटविकास अधिकारी संजयजी राठोड , विस्तार अधिकारी उमेश वाघमारे, अमित बोजेवार, चोंढी केंद्राचे केंद्र समन्वयक प्रल्हाद जाधव,तालुका क्रीडा सचिव गोविंद जाधव व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष तांबारे, आलासिंग राठोड, बीबीषण राठोड, सदानंद राठोड, दिलीप जाधव, परमानंद राठोड, प्रकाश चिरंगे, राहुल जाधव,बलदेव राठोड, उदल जाधव,रविराज राठोड,गजानन हमाने, चंदल पवार,उल्हास राठोड, केवल भिसे व समस्त ग्रामस्थांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# मोहदा नगरीत शिवभक्तीचा जागर! ह.भ.प. कांचनताई शेळके यांच्या वाणीतून रंगणार 'श्री शिव महापुराण कथा'

**▸विदर्भ केसरी। पांढरंकवडा ता. प्रतिनिधी**

पांढरंकवडा:-भारतीय संस्कृतीत पुराणांना अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि त्यातही 'शिव महापुराण' हे मनुष्याला मुक्तीचा मार्ग दाखवणारे शास्त्र मानले जाते. याच पवित्र ग्रंथाचा महिमा गाण्यासाठी मोहरा नगरी सज्ज झाली असून, येत्या १० फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'श्री शिव महापुराण कथे'*चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरातील वातावरण भक्तिमय झाले असून ग्रामस्थांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे.शिव महापुराणाचे आध्यात्मिक महत्त्व पुराण हे केवळ कथा नसून ते जगण्याचे शास्त्र आहे. भगवान शंकरांच्या विविध रूपांचे वर्णन, सृष्टीची उत्पत्ती आणि कर्माचा सिद्धांत यात मांडला आहे. कलयुगात शिवाची भक्ती ही अत्यंत सुलभ आणि फलदायी मानली जाते. 'शिव' या शब्दाचा अर्थच 'कल्याण' असा आहे. ही कथा श्रवण केल्याने मनातील नकारात्मकता नष्ट होऊन चित्त शुद्ध होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या कथेच्या माध्यमातून भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा त्रिवेणी संगम भाविकांना अनुभवायला मिळणार आहे. कथा प्रवक्त्यांचे मार्गदर्शन या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे युवा कथा प्रवक्त्या स्वरभूषण ह.भ.प. कु. कांचनताई शेळके(आळंदीकर). आपल्या ओघवत्या आणि सुमधुर वाणीने त्या भाविकांना शिवलीलेच्या रसात न्हाऊ घालणार आहेत. आळंदीच्या संस्कारातून घडलेल्या कांचनताईंच्या प्रवचनातून अध्यात्माची गोडी युवकांमध्ये निर्माण होईल, असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे. कथेची वेळ दररोज सायंकाळी ७:०० ते रात्री १०:०० अशी ठेवण्यात आली असून, कामावरून घरी परतणाऱ्या भाविकांनाही याचा लाभ घेता येईल.कार्यक्रमाची रुपरेषा आणि विशेष आकर्षणे कार्यक्रमाची सुरुवात मंगळवार, १० फेब्रुवारी रोजी भव्य दिंडी सोहळ्याने होणार आहे. बसस्टॉप ते सोमेश्वर देवस्थान दरम्यान निघणाऱ्या या दिंडीत वारकरी आणि शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी होतील. यावेळी शिवलिंगाचे विधिवत पूजन केले जाईल. या कथेमध्ये केवळ प्रवचन नसून दृश्य स्वरूपातही अनेक प्रयोग केले जाणार आहेत.

■ **यात प्रामुख्याने:**

कैलास पर्वत देखावा: भाविकांना प्रत्यक्षात कैलास पर्वतावर असल्याचे अनुभवता येईल असा हुबेहूब देखावा. शिव-पार्वती विवाह: भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या विवाहाचा प्रसंग अत्यंत थाटामाटात साजरा केला जाईल.

शिव तांडव: शिवाची रौद्र रूपे आणि तांडव नृत्याची चित्तथरारक सादरीकरणे. महोत्सवाची सांगता आणि महाप्रसाद सप्ताहाची सांगता १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता काल्याच्या अभंगाने होईल. यानंतर दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला जाईल. भगवान शिवाच्या आशीर्वादाचा महाप्रसाद सर्व भाविकांना दिला जाणार आहे. संयोजन आणि सुविधा हा भव्य सोहळा गुरु माऊली शांताबाई रोकडे, नारायण महाराज संस्थान, जगदंबा नगरी, मोहदा(सराटी रोड) येथे पार पडणार आहे. शिव पुराण महिला समिती, देणगीदार आणि समस्त ग्रामस्थ मोहदा यांनी या कार्यक्रमासाठी अहोरात्र परिश्रम घेतले आहेत. दूरवरून येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, बैठक व्यवस्था आणि वाहनतळाची योग्य सोय करण्यात आली आहे. जे भाविक प्रत्यक्ष उपस्थित राहू शकणार नाहीत, त्यांच्यासाठी KGN NEWS आणि YouTube वर थेट प्रक्षेपणाची सोय उपलब्ध आहे. या पवित्र महोत्सवात सहभागी होऊन शिवभक्तीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## सांगली महापालिकेच्या महापौरपदी भाजपचे धीरज सूर्यवंशी

▸विदर्भ केसरी।

सांगली : सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेच्या महापौरपदी भाजपचे धीरज चंद्रकांत सूर्यवंशी, तर उपमहापौरपदी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे गजानन रामू मगदूम यांची मंगळवारी बिनविरोध निवड झाली. पीठासन अधिकारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी निवडीची अधिकृत घोषणा केली. यानंतर दोन्ही पक्षाच्या समर्थकांनी घोषणाबाजी करीत जल्लोष केला. महापालिका निवडणुकीत भाजपला ३९ जागा मिळाल्या होत्या. सभागृहात स्पष्ट बहुमतांसाठी एका जागेची गरज होती. काँग्रेसला १८, राष्ट्रवादी (अजित पवार) १६, शिंदेसेना २, तर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला तीन जागा मिळाल्या होत्या.

महत्त्वाचे



## जिल्हा मध्यवर्ती अकोला बँके तर्फे श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त महाप्रसादाचे वाटप

▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी :विठ्ठल भागवत

मेडशी:- श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त मेडशी येथील जिल्हा मध्यवर्ती बँक अकोला.मेडशी शाखा तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षी श्री संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून प्रसादाचे वाटप करण्यात आले या वेळी उपस्थित शाखाधिकारी जितेंद्र खंडारे,रोखपाल संदीप खुळे. कु समीक्षा बोरसे. संतोष साठे. संतोष तायडे. व गावातील नागरिकानी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला महाप्रसादाचा वाटप करून श्री संत गजानन महाराज प्रकटदिन उत्साहात साजरा करण्यात आला

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी राज्याचा मोठा निर्णय, टास्क फोर्सची स्थापना

▸विदर्भ केसरी।

राज्यातील शेतकरी आत्महत्या ही गंभीर सामाजिक समस्या लक्षात घेऊन कृषी विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष 'टास्क फोर्स' उभारण्याची घोषणा कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी परिपत्रकाद्वारे केली आहे. या कृती दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासोबतच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या संकटांवर एकत्रित उपाययोजना राबविण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. अशा प्रकारचे कृती दल स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या कृती दलाचे नेतृत्व विस्तार व प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी करणार आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे आणि सोनाली शिळकर या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या दलात केवळ प्रशासकीय अधिकारीच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या तज्ज्ञांनाही स्थान देण्यात आले आहे. 'शिवार फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर संशोधन करणारे कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा आणि महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर अभ्यास करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ सृष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या कृती दलाच्या कामात मानवी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे केवळ कागदी योजनांपुरते न पाहता प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचा उद्देश आहे. राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजना, उपक्रम आणि कार्यक्रम सातत्याने राबवले जात आहेत. तरीही हवामान बदलामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक ताणतणाव, सामाजिक दबाव आणि मानसिक अस्थैर्य यामुळे शेतकरी अनेक अडचणींचा सामना करत आहेत. या सर्व घटकांचा विचार करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि मानसिक आधार देणे आवश्यक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

## जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेची घोडदौड

▸विदर्भ केसरी।

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी




झालेल्या निवडणुकांमध्ये शिवसेनेला पुन्हा एकदा मोठं यश मिळाले आहे. मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेचा जिल्हा परिषद आणि पंचायत समितींमध्ये ४५ टक्के स्ट्राईक रेट राहिला. कोकणात पुन्हा एकदा शिवसेनेची भगवी लाट आली असून रत्नागिरी जिल्हा परिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकला. रायगड आणि छत्रपती संभाजी नगरमध्ये शिवसेना सर्वात मोठा पक्ष ठरला. या निवडणुकीत महायुती सुसाट असून उबाठा आणि महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला.राज्यातील जनतेने सलग चौथ्या निवडणुकीत शिवसेनेला भरघोस मतदान करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले. जिल्हा परिषद निवडणुकीत १५७ उमेदवार निवडून आले तर पंचायत समितींसाठी शिवसेनेचे ३१५ विजयी झाले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्हा परिषदांसाठी १५ जाहीर सभा घेतल्या होत्या. रत्नागिरी जिल्हा परिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकला. १२५ पंचायत समित्यांपैका २५ हून अधिक पंचायत समित्यांची सत्ता शिवसेनेला मिळाली. तळकोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेसाठी शिवसेनेचे १९ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी १३ उमेदवार विजयी झाले असून शिवसेनेचा ६५ टक्के स्ट्राईक रेट नोंदवला आहे. सिंधुदुर्गातील पंचायत समिती गणांमधून शिवसेनेचे २८ उमेदवार विजयी झाले. रत्नागिरी जिल्हा परिषदेसाठी ४८ उमेदवार निवडणुकीत होते त्यापैकी तब्बल ४१ उमेदवार विजयी झाले तर पंचायत समित्यांमध्ये ७५ उमेदवार विजयी झाले. रायगड जिल्हा परिषदेवर शिवसेनेचे १९ उमेदवार विजयी झाले आहेत तर पंचायत समित्यांमध्ये ३८ उमेदवार विजयी झाले.

### उबाठा आणि महाविकास आघाडीचा सुपडा साफ

विधानसभा, नगरपालिका आणि महानगर पालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही उबाठा आणि महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला. कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून घरात बसणाऱ्या उबाठाला मतदारांनी पुन्हा एकदा नाकारले. उबाठा कोकणपाठोपाठ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातून हद्दपार झाली आहे. याउलट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेची आगेकूच सुरु आहे. शिवसेना आणि महायुतीच्या विकासाच्या अजेंड्याला जनतेने पसंती दिली.

# रस्ता मृत्यूचा सापळा!

## प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे नागरिक संतप्त! शीतलताई राठोड यांचा आंदोलनाचा इशारा

▸विदर्भ केसरी। मंगरुळपीर (प्रतिनिधी) :

भडकुंभा फाटा ते भडकुंभा रामगड या रस्त्याची अवस्था इतकी भीषण झाली आहे की हा रस्ता नसून जणू नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे, उघडी गिट्टी व प्रचंड धूळ यामुळे दररोज अपघात होत असून प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचा आरोप संतप्त नागरिकांनी केला आहे. रोज शेकडो विद्यार्थी, शेतकरी, महिला, वृद्ध व रुग्ण या मार्गावरून जीव धोक्यात घालून प्रवास करत आहेत. दुचाकी घसरून पडणे, वाहने बंद पडणे, रुग्णवाहिकांना अडथळे येणे हे रोजचेच झाले आहे. तरीही



संबंधित अधिकारी केवळ कार्यालयात बसून पगार घेण्यात मग्न आहेत, अशी तीव्र टीका नागरिकांकडून होत आहे. धानोरा-पोहरा देवी रस्त्यासाठी सुरू असलेल्या मुरूम वाहतुकीसाठी या मार्गाचा वापर करून संपूर्ण रस्ता उद्ध्वस्त करण्यात आला आहे. जड टिप्परच्या सततच्या वाहतुकीमुळे रस्त्याची चाळण झाली असून याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे. हा रस्ता मंगरुळपीर बाजारपेठ, तहसील, न्यायालय, शाळा तसेच ग्रामीण भागाला जोडणारा एकमेव मार्ग आहे. मात्र प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे हा मार्ग आता संकटाचा मार्ग बनला आहे. कोट्यवधींचा निधी कुठे जातो? रस्ते दुरुस्तीसाठीचा पैसा

### आता तरी प्रशासन जागे होणार का?

■ की एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी गेल्यावरच हालचाल करणार? असा रोषपूर्ण सवाल संपूर्ण परिसरात घुमत आहे.

अधिकाऱ्यांना धडा शिकविल्याशिवाय शांत बसणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का? की एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी गेल्यावरच हालचाल करणार? असा रोषपूर्ण सवाल संपूर्ण परिसरात घुमत आहे.

## विद्यार्थ्याचा लोकलमधून पडून मृत्यू

▸विदर्भ केसरी।

राज्यात आजपासून १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षांना सुरुवात झाली. मात्र परीक्षेच्या पहिल्या दिवशी डोंबिवलीतील एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परीक्षेसाठी घरातून निघालेला १८ वर्षांचा सोहम सचिन कटरे हा विद्यार्थी नियतीच्या क्रूर खेळाचा बळी ठरला. कळवा आणि मुंब्रा स्थानकांदरम्यान लोकलमधून पडून सोहमचा जागीच मृत्यू झाला.

डोंबिवली येथे राहणाऱ्या सोहमचे परीक्षा केंद्र कळवा येथील मनीषा विद्यालय येथे होते. आज बारावीचा पहिलाच पेपर असल्याने सोहम परीक्षेचे साहित्य घेऊन सकाळी घरातून निघाला होता. सकाळची वेळ असल्याने रेल्वेमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी होती. सोहम सुद्धा या गर्दीतून वाट काढत लोकलमधून प्रवास करत होता. मात्र, कळवा-मुंब्रा दरम्यान गर्दीच्या रेट्यामुळे सोहमचा लोकलमधून तोल गेला आणि तो धावत्या लोकलमधून खाली कोसळला.

## कंपनीला भीषण आग

नागपूर : कामठी जवळील उप्पवाडी येथील मेहाडिया इंटरप्रायजेस प्रा.लि.या पेपर प्रोसेसिंग कंपनीला मंगळवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत कंपनीची संपूर्ण मशिनरी आणि कच्चा माल जळून खाक झाला असून, सुमारे ५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अग्निशमन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मधुसुधन उदयप्रकाश मेहाडिया यांच्या मालकीच्या या कंपनीत मंगळवारी पहाटे दिड वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. कंपनीत मोठ्या प्रमाणावर पेपरचा साठा आणि केमिकल असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले.

# चंद्रपुरात भाजप-ठाकरे सेना एकत्र

▸विदर्भ केसरी।

चंद्रपूर महानगरपालिकेतील महापौर निवडणुकीने राज्याच्या राजकारणात नवे समीकरण उभे केले आहे. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एकत्र आले. ठाकरेंच्या शिवसेनेने भाजपला पाठिंबा देत महापौरपदासाठी साथ दिली. या निर्णयामुळे चंद्रपूरमधील राजकीय वातावरण ढवळून निघाले. या करारानुसार भाजपला महापौरपद मिळणार तर ठाकरेंच्या शिवसेनेला स्थायी समितीवर नियंत्रण मिळणार असल्याचे ठरले.

या पार्श्वभूमीवर भाजपच्या संगीता खांडेकर या महापौरपदी विराजमान झाल्या. त्यांनी काँग्रेसच्या वैशाली महाडोळे यांचा अतिशय चुरशीच्या लढतीत पराभव केला. खांडेकर यांना 32 मते मिळाली, तर महाडोळे यांना 31 मते मिळाली. अवघ्या एका मताच्या फरकाने झालेला हा निकाल महापालिकेतील राजकीय संतुलन किती नाजूक आहे, हे दाखवणारा ठरला. ठाकरेंच्या शिवसेनेचा पाठिंबा निर्णायक ठरल्याची चर्चा सुरू झाली.ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांनी या निर्णयामागचे कारण स्पष्ट केले. काँग्रेसनेही स्थायी समिती देऊ केली होती; मात्र पुढील पाच वर्षांत महापौरपद मिळण्याची शक्यता नसल्याने भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. सत्तेत थेट सहभाग आणि प्रभावी भूमिका मिळावी, या विचारातून हा निर्णय झाल्याचे त्यांनी नमूद केले. महानगरपालिकेतील एकूण 66 जागांचे चित्रही या समीकरणाला अधिक स्पष्ट करते. काँग्रेसकडे 27 जागा आहेत, तर काँग्रेसशी निवडणूकपूर्व आघाडी असलेल्या जनविकास सेनेकडे 3 जागा आहेत. भाजपकडे 23, शिंदे सेनेकडे 1, उबाठा शिवसेनेकडे 6, वंचितकडे 2, बसपाकडे 1, काँग्रेस बंडखोर अपक्ष 2 आणि एमआयएमकडे 1 जागा आहे. या सर्व संख्याबळात झालेल्या बदलामुळे सत्तेचे गणित नव्याने मांडावे लागले. एकूणच, चंद्रपूरमधील महापौर निवडणुकीने केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे तर राज्याच्या राजकारणातही चर्चा निर्माण केली आहे. स्थायी समितीच्या बदल्यात दिलेला पाठिंबा, एका मताने झालेला विजय, आणि त्यावर उमटलेली राजकीय प्रतिक्रिया यामुळे चंद्रपूरचा हा प्रयोग पुढील राजकीय घडामोडींमध्ये दिशादर्शक ठरू शकतो.

### काँग्रेसला अंतर्गत गटबाजीचा फटका - सपकाळ

**■ या घडामोडींवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. चंद्रपूरमध्ये ठाकरे सेनेचा भाजपला पाठिंबा ही घटना महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम करणारी ठरेल, असे ते म्हणाले. ठाकरे सेनेसोबत वंचितचे दोन नगरसेवकही भाजपसोबत जाणार असल्याची प्राथमिक माहिती त्यांनी दिली. अंतर्गत गटबाजीचा फटका काँग्रेसला बसत असल्याचेही त्यांनी मान्य केले. चंद्रपूरमधील या राजकीय बदलाचा परिणाम आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकांवर होऊ शकतो, अशी चर्चा सुरू आहे. विशेषतः राज्यसभेच्या निवडणुकीत मविआच्या संख्याबळातून जाणाऱ्या खासदाराच्या गणितावर याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच उद्धव ठाकरे पुन्हा विधानपरिषदेवर जाणार असल्यास त्यांना मित्रपक्षांच्या पाठिंब्याची गरज भासू शकते.**



## अवैध पार्किंग, अवजड वाहनांमुळे दिंडोरीत तासन्तास वाहतूक कोंडी

▸विदर्भ केसरी।

शहरातील वाढती वाहतूक कोंडी गंभीर बनली असून तासन्तास होणाऱ्या कोंडीमुळे वाहनधारक, औद्योगिक क्षेत्रातील कामगार तसेच स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः रविवारी आठवडी बाजाराच्या दिवशी परिस्थिती अधिकच बिकट होत असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून शहरातील वाहतुकीला शिस्त लावावी, अशी मागणी जोर धरत आहे.

शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा प्रश्न वाढत चालला आहे. उमराळे चौफुली, बसस्थानक परिसर, जुना कळवण रोड आणि पालखेड रोड या भागांत रोजच वाहतूक ठप्प होत आहे. शहरात ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. येथील बसस्थानकात बसेसची सातत्याने ये-जा सुरू असल्याने अनेकदा वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. लखमापूर, पालखेड व अकराळे येथील औद्योगिक क्षेत्रातील अवजड वाहने शहरातून जात असल्याने पालखेड चौफुली हा वाहतूक कोंडीचा केंद्रबिंदू ठरला आहे. त्यातच नाशिक-कळवण रस्त्यावर अस्ताव्यस्तपणे करण्यात येणारी पार्किंग कोंडीला अधिकच बळ देत आहे.

# माफियांच्या दबावाला न जुमानता पत्रकार सिद्दिकी ठाम

## धमक्या, हल्ला आणि खंडणी प्रकरणामुळे चंद्रपुरात खळबळ

▸विदर्भ केसरी। चंद्रपूर |

चंद्रपूर औद्योगिक जिल्ह्यात कोळसा व्यवसायाशी संबंधित कथित गैरव्यवहार उघड करणाऱ्या दैनिक भास्करचे विशेष प्रतिनिधी शब्बीर अहमद सिद्दिकी यांना दबावात आणण्यासाठी कोळसा माफियांनी सर्व मार्गांचा अवलंब केल्याचा गंभीर आरोप सिद्दिकी यांनी केला आहे. 50 कोटी रुपयांच्या मानहानीच्या नोटिसीपासून ते जीवघेण्या हल्ल्यापर्यंतचा हा प्रकार सध्या मोठ्या चर्चेचा विषय ठरला आहे. सिद्दिकी यांनी कोळसा उद्योगाशी संबंधित कथित भ्रष्टाचार, अनियमितता आणि गैरव्यवहारांवर सातत्याने बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित कंपन्या आणि व्यक्तींमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याचे सांगितले जाते. या बातम्यांनंतर त्यांना 50 कोटी रुपयांच्या मानहानीचा दावा करत नोटीस पाठवण्यात आली. मात्र दबावाला बळी न पडता सिद्दिकी यांनी आपली पत्रकारिता सुरूच ठेवली. त्यानंतर दबावाचे स्वरूप अधिक गंभीर झाले. सिद्दिकी यांच्या आरोपानुसार 18 जानेवारी 2026 रोजी नागपूर येथे त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला, ज्यातून ते बालंबाल बचावले. यानंतर त्यांनी 19 जानेवारी रोजी गिट्टीखदान आणि मानकापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणानंतर कथितरित्या आरोपींनी पोलिसांशी संगनमत करत सिद्दिकी यांच्याविरोधात खंडणी मागितल्याचा



खोटा गुन्हा दाखल करण्याची योजना आखल्याचा आरोप आहे. या योजनेनुसार कोळसा वॉशरी व्यवस्थापक प्रमोद जवाहर निर्मळकर यांना तक्रारदार बनवून 21 जानेवारी 2026 रोजी धुगुस पोलीस ठाण्यात पत्रकार सिद्दिकी यांच्यावर 10 लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी एफआयआर क्रमांक 0022/2026 नोंदवण्यात आला आहे. सिद्दिकी यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत आपण निर्मळकर यांना ओळखत नसल्याचे तसेच कधीही त्यांच्याशी संपर्क झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, कोळसा व्यावसायिक, कथित भ्रष्ट अधिकारी आणि पोलिस यांच्यातील संगनमतातूनच ही कारवाई करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणी सिद्दिकी यांनी सीबीआय (नागपूर), विशेष पोलीस महानिरीक्षक, एसीबी, मुख्यमंत्री कार्यालय तसेच चंद्रपूर न्यायालयात याचिका दाखल केली असून संबंधित पोलीस अधिकारी, कोळसा व्यावसायिक आणि कंपन्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. न्यायालयीन अवमाननाचे नोटीसही संबंधितांना बजावण्यात आले आहे. या प्रकरणात धुगुस पोलीस ठाण्याचे निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक, महागया इन्फ्रा, क्लीन कोल एंटरप्रायझेस, एनएम ग्लोबल तसेच काही कोळसा व्यावसायिकांची नावे आरोपांच्या कक्षेत आली आहेत. हा संपूर्ण प्रकार आता न्यायालयीन प्रक्रियेत असून चौकशी यंत्रणांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणामुळे भ्रष्टाचार उघड करणाऱ्या पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# तब्बल 30 वर्षानंतर गुरुजन व माजी विद्यार्थ्यांच्या भेटींचा सुवर्णक्षण

▸विदर्भ केसरी। दर्यापूर -

येथील नामांकीत प्रबोधन विद्यालयाच्या मार्च 1996 मध्ये उतीर्ण झालेल्या पाच,पन्नास नव्हे तर 87 माजी विद्यार्थी व विद्यार्थीनी तब्बल 30 वर्षानंतर एकत्र येऊन नुकताच ह्रदयस्पर्शी गुरुशिष्य कृतज्ञता तथा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा शिस्तबद्ध आयोजन करून उत्साहात संपन्न झाला प्रबोधन शाळेतील आपल्या गुरुजनांना आदर्श मानून जीवनात यशश्वीपणे या बॅचमधील घडलेले माजी विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, वकील, व्यावसायिक, पोलीस अधिकारी, डॉक्टर, इंजिनियर, विक्रीकर अधिकारी, तलाठी, कृषी अधिकारी, तहसिलदार, तसेच आधूनिक शेतकरी ते देशाचे जवान इत्यादी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व इतरत्र ठिकाणाहून आले होते तसेच या सर्व माजी विद्यार्थ्यांना अध्यापन करणारे परंतू सेवानिवृत्त झालेले तेव्हाचे वर्गशिक्षक आणि विषय शिक्षक तसेच प्रबोधन विद्यालयाचे सध्याचे प्राचार्य आणि कार्यरत शिक्षक या हृदयस्पर्शी स्नेह मेळाव्याला उपस्थित होते.सर्वप्रथम सर्व माजी



विद्यार्थ्यांनी तब्बल 30 वर्षानंतर उंचीनुसार रांगेत उभे राहून शिस्तीतच शालेय प्रार्थना म्हटली त्यानंतर प्रमुख कार्यक्रमाला सुरुवात झाली छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले आणि प्रबोधनचे संस्थापक अध्यक्ष मामा क्षीरसागर व बाबा रेडीकर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे विधिवत उद्घाटन झाले. त्यानंतर ह्यात नसलेले गुरुजन व काही मित्र आणि नुकताच राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाल्यामुळे सर्वांना एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करून त्यांचे स्मरण करण्यात आले त्यानंतर व्यासपीठावरील सर्व आजी-माजी गुरुजनांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प व ग्रामगीता देऊन स्वागत सोबतच यथोचीत सत्कार करण्यात आला त्यानंतर उपस्थित सर्व मित्रांनी सद्यस्थितीत कार्यरत असल्याचा नावासह परिचय दिला. त्यानंतर राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक उमेश सराळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यानंतर शिल्पा कडु (राज्य विक्रीकर अधिकारी, पुणे) व किशोर बागडे (तहसिलदार,भामरागड) यांनी सर्वांतर्फे मनोगत व्यक्त केले त्यानंतर प्रमुख अतिथी यांचे तर्फे गणित शिक्षक व माजी प्राचार्य किशोर कावडकर, माजी प्राचार्या मेघा धर्माधिकारी माजी उपप्राचार्या मगरे माजी उपप्राचार्या शोभा भिसे सद्या कार्यरत उपप्राचार्या प्रतिभा संत आदिंनी आपल्या माजी विद्यार्थ्यांप्रती संवेदना व्यक्त केल्या तेव्हा त्यांनी आज हा आमच्यासाठी सेवानिवृत्त झाल्यानंतर सुद्धा तुम्ही सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आमच स्वागत व सत्कार करणे म्हणजे आम्हाला नवचैतन्य व जीवनात नवऊर्जा देणारा फार मोठा आनंदाचा क्षण आहे असे गौरवोद्गार व सहृदय संवेदना आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. उद्घाटनीय भाषणातून प्राचार्य प्रा.नरेंद्र गोंडाने यांनी तुम्ही सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन हा स्नेहसोहळा घडवून आणला त्याबद्दल सर्वांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्यात अध्यक्षीय भाषण सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षक मधुकर घोडस्कर यांनी केले माझ्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला हा सोहळा आमच्यासाठी याची देह याची डोळा असा हा सुवर्णक्षण आहे त्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानून सर्वांना शुभेच्छारूपी आशीर्वाद दिलेत कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुकर घोडस्कर तर उद्घाटक प्राचार्य प्रा. नरेंद्र गोंडाणे होते तर प्रमुख अतिथी माजी उपमुख्याध्यापिका शोभा भिसे, माजी प्राचार्या मेधा धर्माधिकारी, माजी उपमुख्याध्यापिका वृषाली मगरे, डी. एस. बनसोड, एस. के. ठाकूर, गजानन सरदार, शारिरीक शिक्षक लालसिंग राठोड तर कला शिक्षक प्रफुल्ल ठाकरे इत्यादी आजी-माजी शिक्षक विचारमंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नरेंद्र विझे यांनी. तर प्रास्ताविक उमेश सराळे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अथक परिश्रम व मेहनत रुपेश मलिये, शिल्पा कडू, ज्योती काळे, प्रणय बिहाडे, गंगाधर मलिये, निलेश इंगळे, सचिन चंदन, मंगेश सगणे, यांनी घेतली. तसेच कार्यक्रमाला माजी विद्यार्थिनींपैकी तपस्विनी वानखडे, दिपाली डिके, सुगंधा घाटे, रुपाली साखरे, कविता काकड, अनिता खांडे, रुक्मा राठोड, सुनिता शर्मा, शिल्पा पांडे, चित्रा लांडे, शिल्पा गावंडे, अर्चना केवतकर, किर्ती जटाळे, वर्षा राऊत, वैशाली विंचूरकर,ज्योती बोंडे, तसेच माजी विद्यार्थ्यांपैकी निलेश इंगळे, निलेश देशमुख, बजरंग ठाकरे, निलेश होले, दिलीप चव्हाण, प्रविण कासारकर, महेश पिंजरकर, नितिन भदे, हेमंत नितनवरे, ईश्वर मलिये, सचिन मलिये, किशोर बागडे, भास्कर गाठेकर, देविदास सरपटे, नितीन भदे, विनोद नाईक, संदीप इंगोले, विवेक लाखे, निलेश खंडेलवाल, नितीन भांडे, पंकज भांबुरकर, सचिन जाधव, संदिप इंगोले, प्रमोद गहरवाल, मनोज ताकोते, रुपेश चव्हाण, भाष्कर गाठेकर, देविदास सरपटे, निलेश खंडेलवाल, आनंद बोरेकर, राम डायलकर, प्रशांत थोरात अक्षय गोळे, निलेश पारडे, अमोल कोकाटे, निशिकांत पाखरे, देवेश राऊत, अभिजीत टाले, प्रकाश बेगडे, विनोद नाईक, गणेश उघडकर, उमेश खाडे, महेश कान्हेरकर, प्रमोद बन्सी, मनोज मोरे, सोमेश्वर गवळी, पप्पू बुंदेले आदी मित्रांची उपस्थिती होती. माजी विद्यार्थी तथा मित्रांच्या या स्नेहमेळाव्याची सांगता दर्यापूर नगर परिषदचे नगर सेवक तथा माजी सभापती प्रदीपभाऊ मलिये यांच्या दर्यापूर नगरीच्या मधोमध असलेल्या वाडीत स्नेहभोजन घेऊन करण्यात आली.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## जिमलगट्टा शासकीय आश्रम शाळेत 10 वी व 12 वि च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : राजेश कुमरे





अहेरी : अहेरी तालुक्यातील जिमलगट्टा शासकीय आश्रम शाळा जिमलगट्टा येथे वर्ग 10 वी व 12 वी च्या विध्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या प्रसंगी आज निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शैलेंद्र कावळे सर, प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षक कुसराम सर, कु. जांभुळकर मॅडम, डोके सर, कोडापे सर, चकिनारपू सर, कु. आत्राम मॅडम, कु. लामगे अधिक्षिका उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरानी विध्यार्थ्यांना होणाऱ्या परीक्षे संदर्भात मोलाचे मार्गदर्शन करून भविष्यात यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक कावळे सर यांनी विध्यार्थ्यांनी शिक्षक हे गुरू असल्याने शिक्षकांचा आदर नेहमी करून चौकस बुद्धीने स्वतःचा विकास करावा असे अनमोल मार्गदर्शन करण्यात आले आहे, या वेळी शाळेचे संपूर्ण शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त



### मन्नेराजाराम येथे गोदाम अभावी धान खरेदी रखडली; उघड्यावर खरेदीला मंजुरी द्यावी

भामरागड/अहेरी : आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मन्नेराजाराम अंतर्गत येणाऱ्या शासकीय धान खरेदी केंद्रावर गोदामाची कमतरता असल्याने धान खरेदीचा प्रश्न गंभीर झाला आहे. ६०० हून अधिक नोंदणीकृत शेतकऱ्यांचे धान अजूनही खरेदीच्या प्रतीक्षेत असून, प्रशासनाने तातडीने उघड्यावर धान खरेदीला परवानगी द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मन्नेराजाराम येथील केंद्रावर हंगामासाठी ७६८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. मात्र, सध्या उपलब्ध असलेल्या ३४०० क्विंटल क्षमतेच्या गोदामात जागा नसल्याने केवळ ८२ शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी होऊ शकली आहे. अद्याप ६८६ शेतकरी शिल्लक असून, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात धान विक्रीसाठी तयार आहे. शासकीय गोदाम उपलब्ध नसल्यामुळे खरेदी प्रक्रिया ठप्प झाली आहे. शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत आपल्या पिककर्जाची परतफेड करावी लागते. जर वेळेत धान खरेदी झाली नाही, तर शेतकऱ्यांकडे कर्ज फेडण्यासाठी पैसे उपलब्ध होणार नाहीत. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता असून, त्यांना व्याजाचा भुर्दंड सोसावा लागू शकतो. धान खरेदीची मुदत संपण्यापूर्वी सर्व शेतकऱ्यांचे धान खरेदी करणे गरजेचे आहे.

माजी समाजकल्याण सभापती श्री इंदनशहा रामसहा मडावी यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी उपप्रादेशिक व्यवस्थापक, अहेरी यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात मागणी करण्यात आली आहे की, शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन सुरक्षित आणि उघड्या जागेवर धान खरेदी करण्याची विशेष परवानगी देण्यात यावी. या निवेदनाची प्रत भामरागडच्या तहसीलदारांनाही माहितीसाठी पाठवण्यात आली आहे. यावेळी अनिल मडावी, रामय्या सडमेक, वैभव पुजलवार, देवाजी मडावी यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते. आता प्रशासन यावर काय सकारात्मक पाऊल उचलते, याकडे संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### झाडीपट्टी नाट्य व लावणी परंपरा धोक्यात – अश्लीलतेविरोधात सक्त कारवाईची मागणी

गडचिरोली : झाडीपट्टी नाट्य व लावणी ही महाराष्ट्राची समृद्ध लोककला असून अनेक कलाकार मनापासून रंगमंचाची पूजा करत ही परंपरा जपण्याचे काम करत आहेत. मात्र सध्या लावणीच्या नावाखाली काही ग्रुपचे निर्माते व काही कलावंतांकडून अश्लील नृत्य, अंगप्रदर्शन आणि पैशांची उधळपट्टी सुरू असून त्यामुळे या पवित्र कलेची बदनामी होत आहे. काही ठिकाणी प्रेक्षकांच्या अतिशय जवळ बसून पैसे घेणे, अश्लील हावभाव करणे आणि अंगप्रदर्शन करणे असे प्रकार खुलेआम सुरू आहेत. अशा विकृत प्रवृत्तीमुळे प्रामाणिक आणि मेहनती कलाकारांवरही वाईट परिणाम होत असून झाडीपट्टी नाट्याची सामाजिक प्रतिमा मलीन होत आहे. विशेष म्हणजे भंडारा जिल्ह्यातील काही ग्रुप गडचिरोली जिल्ह्यात येऊन अशा स्वरूपाचे अश्लील कार्यक्रम सादर करत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा ग्रुपना गडचिरोली जिल्ह्यात कार्यक्रम करण्याची परवानगी देऊ नये, अशी ठाम भूमिका झाडीपट्टी संघटनेने घेतली आहे. लावणी व झाडीपट्टी नाट्याच्या नावाखाली चाललेले हे गैरप्रकार तात्काळ थांबवावेत, अशा ग्रुप व कलाकारांवर सक्त कारवाई करावी आणि भविष्यात कार्यक्रमांना परवानगी देतांना कडक निकष लावावेत, अशी ठोस मागणी झाडीपट्टी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. अध्यक्ष मनीष मोटघरे , उपाध्यक्ष विलास कावळे, कोषाध्यक्ष रश्मी रामटेके, सचिव प्रज्वल मेश्राम आणि समस्त झाडीपट्टी सदस्य संघटना यांनी ही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस सांस्कृतिक विभागाचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष भुवनभाऊ लिल्हारे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

# पैनगंगा प्रकल्पाच्या कामात अधिकारी व ठेकेदारांचा धुडगूस

## जिल्हाधिकारी यांच्याकडून पेसा ग्रामपंचायतच्या ग्रामसभेच्या ठरावाला केराची टोपली

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : बबिता शिवणकर





पैनगंगा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या ( पेसा ) ग्रामपंचायतच्या ग्रामसभेच्या ठरावात घेण्यात आलेल्या मुद्द्याला डावलून जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्वतःच्या अधिकारात भुसुरूंग स्फोटाची परवानगी दिल्याने या विरोधात निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने आज जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यावर आक्षेप नोंदविला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की सतत वादग्रस्त ठरलेल्या निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम कायद्याला बगल देऊन, हिटलरशाही पद्धतीने, जंगल राज प्रमाणे काम सुरू असून पेसा ग्रामपंचायतीला मिळालेल्या मौलिक अधिकाराचे हनन केल्या जात आहे, पेसा ग्रामपंचायतीला संविधानानुसार मिळालेल्या अधिकाराला पायदळी तुडविल्या जात असताना तसेच भूसंपादन कायदा 2013 नुसार अनुसूचित क्षेत्रामधील जमीन घेता येत नाही, जर शासनाला निकड असल्यास कलम 41/3 नुसार संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम सभेची परवानगी घेणे अनिवार्य आहे, परंतु ग्रामसभेच्या ठरावाला डावलून पाटबंधारे विभागाचे अधिकारी निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम जोरकसपणे करत आहे तसेच खडका आणि खंबाळा या दोन गावाच्या मध्ये असलेल्या पैनगंगा नदीवर भिंतीच्या पायवाचे खोदकाम काम सुरू असून त्या कामात भूसुरंग स्फोट, खोदकाम,माती धरणाचे काम व सांडव्याचे काम रात्रंदिवस चालू आहे. सोबतच भुसुरूंग स्फोट केल्या जात आहे.

याबाबत खडका ग्रामपंचायतीने दिनांक 26 डिसेंबर 2025 रोजी ग्रामसभेच्या ठरावात निम्न पैनगंगा प्रकल्पाचे माती धरणाचे काम, सांडव्याचे खोदकाम व भुसुरूंग स्फोट करण्याची परवानगीला मुदतवाढ न देण्याचा ठराव सर्वानुमते पारित केला आहे, भुसुरूंग स्फोटाला हरकत नोंदवून पेसा ग्रामपंचायतच्या परवानगीशिवाय भुसुरूंग स्फोट करू नये असे स्पष्टपणे ग्रामसभेच्या ठरावात नोंदविले आहे. परंतु यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी दिनांक 6 जानेवारी 2026 रोजी पाटबंधारे विभाग व कंत्राटदाराला खडका ग्रामपंचायतच्या हद्दीत भुसुरूंग स्फोट करण्याची स्वतः च्या अधिकारात परवानगी दिलेली आहे, ही परवानगी 31 डिसेंबर 2026 पर्यंत वैद्य असल्याचे नमूद केले आहे.

खडका ही पेसा अंतर्गत येणारी ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायतीने काही अटीच्या आधीन राहून या प्रकल्पाला मान्यता दिली होती परंतु त्या अटीपैकी एकही अट शासनाने मान्य केली नाही आणि भुसुरुंगाची स्फोट करण्याची परवानगी सपशेलपणे नाकारली असताना सुद्धा जंगल राज प्रमाणे पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कंत्राटदार वरिष्ठांच्या सहकार्याने या भागात भूसुरूग स्फोटाची मालिका रात्रंदिवस राबवून एकप्रकारे आदिवासी क्षेत्रात धुडगूस घालत असल्यामुळे या भागात लोकशाही आहे की ठोकशाही असा प्रश्न या भागातील जनतेत निर्माण झाला आहे. याबाबत आज निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले व त्यांना प्रत्यक्ष भेटीत सांगितले जर तुम्हाला पेसा ग्रामपंचायतीच्या ग्राम सभेच्या ठरावाला डावलून परवानगी द्यायचा अधिकार असेल तर पेसा ग्रामपंचायतचे सर्व अधिकार तुम्ही गोठवून टाका, पेसा ग्रामपंचायतीचे सर्व प्रकारचे अधिकार काढून टाका किंवा तुम्हाला जर तसं लेखी परवानगी द्यायचा अधिकार असेल तर आम्हाला लेखी स्वरूपात उत्तर द्या, अशी मागणी यावेळी धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यानी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे . तेव्हा मा. जिल्हाधिकारी यांनी पाटबंधारे विभागासोबत लवकरच धरण विरोधी संघर्ष समितीची बैठक लावून याबाबत आपण चर्चा करू असे त्यांनी उत्तर दिले.

यावेळी निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री. प्रल्हादराव पाटील जगताप, प्रसिद्धी प्रमुख तथा संघटक सचिव मुबारक तंवर, सचिव विजय पाटील राऊत, कोषाध्यक्ष प्रल्हादराव गावंडे सर, रवी ठाकरे, विलास भेंडे, अविनाश जगताप, शंकर संगमवार यांसह अनेक शेतकरी व धरण विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा वांजरी येथे दोन दिवसीय क्रीडास्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



पांढरकवडा : महाकाली आदिवासी विकास संस्था द्वारा संचालित,प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा वांजरी येथे दोन दिवसीय क्रीडास्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाकाली आदिवासी विकास संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती प्रमिलाताई देवरावजी गेडाम या होत्या तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव आशिष गेडाम उपस्थित होते.प्रमुख पाहूणे म्हणून पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष बोडेवार,वांजरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच विनोद बोडेवार,संस्थेच्या उपाध्यक्ष तुरपाताई पुसनाके,संस्थेच्या संचालिका सौ.रेणुकाताई गेडाम,संस्थेचे सर्व संचालक मंडळ,कु.कनिष्का गेडाम,बोडेवार काका,पोलीस पाटील अशोक कुमरे,झटाळा येथील प्रतिष्ठित कमर खा पठाण,वाघोली येथील माध्यमिक मुख्याध्यापक साखरकर सर,सेवानिवृत्त शिक्षक मोहुर्ले सर गावातील व पोडावरील गणमान्य नागरिक यांच्यासह प्राथमिक, माध्यमिक मुख्याध्यापक राऊत सर,वानखेडे सर,मोगरकर सर सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग उपस्थित होते.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वाय.आर.राऊत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले आणी उपस्थित पाहुण्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले.कार्यक्रम बघण्यासाठी परिसरातील पालकांनी व ग्रामवासियांनी यावेळीं एकच गर्दी केली होती,या दरम्यान विद्यार्थ्यांकरिता विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी व्हॉलीबॉल,कबड्डी,खो-खो (मुलामुलींचा) तसेच लंगडी या खेळाचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणाना वाव मिळावा,विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक विकास न करता त्यांचा सर्वांगीण.विकास करण्यासाठी दरवर्षी अशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते असे प्रास्ताविकातून मुख्याध्यापक वाय.आर.राऊत यांनी सांगितले.आपल्या अध्यक्षीय भाषणात श्रीमती प्रेमीलाताई देवरावजी गेडाम यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत मार्गदर्शन केले व वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष बोडेवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शाळेतील शैक्षनिक विकासाची व वाढत असलेल्या वस्तीगृह सुविधांची माहिती दिली.संस्था सचिव आशीषभाऊ गेडाम यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. दोन दिवसीय क्रीडास्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शिल्ड देऊन गौरविण्यात आले.तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून वस्तीगृह आवारातील मुलांकरिता नव्याने बांधण्यात आलेल्या शौचालय व स्नानगृहाचे उद्घाटन करण्यात आले.संस्थेने मुलांकरिता व मुलीकरिता स्वतंत्र वॉशिंग मशीन उपलब्ध करून देण्यात आली.या कार्यक्रमाकरिता पालकांची उपस्थिती ही उल्लेखनीय होती,जवळपास दोनशेच्या वर पालक आपल्या विद्यार्थ्यांला प्रोत्साहित करण्यासाठी उपस्थित होते हे विशेष. पालक प्रतिनिधी म्हणून महांडोळी येथील हुसैन आत्राम यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाटे सर,आभार प्रदर्शन बोडेवार सर यांनी केले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी,अधीक्षक आणि अधीक्षिका यांनी अथक परिश्रम घेतले,

# दारू–गुटक्याने देसाईगंज हैराण ! महिलांचा संताप उसळला

## तात्काळ बंदी नाही तर रस्त्यावर उतरण्याचा इशारा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

देसाईगंज (दि.०७ फेब्रु):- त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून महिला क्रांतिकारी व्हाट्सअॅप ग्रुप वडसा–देसाईगंज यांच्या वतीने देसाईगंज पोलीस स्टेशन येथे आज निवेदन देण्यात आले. हे निवेदन संदीप आगरकर (API) मनीष गोडबोले (API) यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. देसाईगंज शहरातील प्रत्येक वॉर्डमध्ये दारू व गुटक्याची खुलेआम, बिनधास्त आणि अवैध विक्री सुरू असून प्रशासन डोळेझाक करत आहे, असा थेट आरोप महिलांनी केला आहे. रात्रंदिवस सुरू असलेल्या दारू, गुटक्याच्या विक्रीमुळे शहरातील शांतता भंग, सार्वजनिक त्रास, महिलांची असुरक्षितता आणि गुन्हेगारीत वाढ यास प्रशासन जबाबदार असल्याचा संतप्त सूर महिलांनी व्यक्त केला आहे.

महिलांनी ठणकावून सांगितले की, “देसाईगंज शहराच्या आरोग्यासाठी, सुरक्षिततेसाठी आणि महिलांच्या सन्मानासाठी तात्काळ दारू व गुटका बंदी लागू करावी.” असा थेट इशारा दिला आहे.जर प्रशासनाने त्वरित कठोर कारवाई केली नाही, तर महिला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, संपूर्ण शहरात बंदी व निदर्शने केली जातील.

### निवेदनातील ठळक मुद्दे

- विनापरवाना दारू व गुटक्याची अवैध विक्री, रात्री उशिरापर्यंत दुकाने सुरू, कायद्याची खुलेआम पायमल्ली, दारू–गुटक्यामुळे घरगुती हिंसाचारात वाढ, महिला व लहान मुलांवर गंभीर परिणाम, तरुण पिढी व्यसनाधीन, गुन्हेगारी वाढतेय, कुटुंबांची आर्थिक वाताहत, गर्भातील अपत्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम.

याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. वर्षा नांदगावे - अॅडमिन, महिला क्रांतिकारी व्हाट्सअॅप ग्रुप, सामाजिक कार्यकर्त्या (हनुमान वॉर्ड, देसाईगंज) सीमा ताई नळे, पूर्णिमा ताई बोरकर, वंदना ताई हुमणे, विना ताई मानवटकर, गीता ताई निमगडे इत्यादी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. देसाईगंजमध्ये दारू–गुटका चालतो, पण कायदा चालत नाही का? असा प्रश्न आता जनतेतून उपस्थित होत असून प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी महिलांनी केली आहे.





# पिपरे दाम्पत्याविरोधात महिला आक्रमक : आत्मदहनाची घोषणा

## पत्रकार परिषदेतून प्रशासनाला थेट इशारा..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : अगरबत्ती प्रकल्प उभारून गरीब शेतकरी व शेतमजूर महिलांना रोजगार देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करत चामोर्शी तालुक्यातील महिलांनी नगरसेवक आशिष अरुण पिपरे व पत्नी नगरसेविका सोनाली आशिष पिपरे यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सोमवार 09 फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेतून महिलांनी न्याय न मिळाल्यास आमरण उपोषणासह आत्मदहन करण्याचा टोकाचा इशारा दिल्याने खळबळ उडाली आहे.

पीडित महिलांच्या म्हणण्यानुसार, 2020 मध्ये पंतप्रधान स्वयंरोजगार योजनेअंतर्गत अगरबत्ती निर्मिती प्रकल्प सुरु करून रोजगार देण्याचे आमिष दाखवण्यात आले. सुमारे 40 महिलांना बैठकीस बोलावून बँकेकडून कर्ज मंजूर करून देतो, ते कर्ज माफ करून दिले जाईल, अशी खोटी आश्वासने देण्यात आली. बँकेशी संगनमत करून प्रत्येकी सुमारे दोन लाख रुपयांचे कर्ज महिलांच्या नावावर मंजूर करून घेतले गेले, मात्र ती रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वळविण्यात आल्याचा आरोप आहे. महिलांच्या नावावर घेतलेल्या कर्जातून अत्यंत हलक्या प्रतीच्या अगरबत्ती मशीन खरेदी करुन त्या स्वतःच्या ताब्यात ठेवण्यात आल्या. नवीन जमीन खरेदी करून मोठा शेड उभारुन प्रकल्प सुरु करण्यात आला, मात्र काही महिन्यांतच प्रकल्प बंद पडला. त्यानंतर बँकांकडून कर्जफेडीच्या नोटिसा येऊ लागल्यावर महिलांनी रोजगार देण्याची किंवा मशीन देण्याची मागणी केली असता 'कर्ज तुम्हालाच भरावे लागेल' असे सांगून त्यांना हाकलून लावल्याचा आरोप करण्यात आला. गेल्या तीन वर्षांपासून कर्ज माफ करून देतो, वरिष्ठ नेत्यांशी चर्चा सुरु आहे, असे सांगत वेळकाढूपणा करण्यात आला.

अखेर बँकांनी न्यायालयीन कारवाई करत मोठ्या रकमेच्या नोटिसा पाठवल्याने महिलांवर जप्तीची भीती निर्माण झाली आहे. नागपूर येथील जनता दरबारात मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन दिल्यानंतर चौकशीचे आदेश होऊनही आजपर्यंत ठोस कारवाई न झाल्याने महिलांमध्ये संताप वाढत आहे. या प्रकरणामुळे अनेक कुटुंबांत तणावाचे वातावरण निर्माण झाले असून कर्जाच्या ओझ्याखाली महिलांना आत्महत्येचा विचार करावा लागत असल्याची वेदना यावेळी व्यक्त करण्यात आली. राजकीय आशीर्वादामुळेच आरोपींवर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोप महिलांनी पत्रकार परिषदेत केला. पीडित महिलांनी पिपरे दाम्पत्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून उत्पन्नाचा ठोस स्त्रोत नसताना जमा केलेल्या अमाप संपत्तीची SIT मार्फत चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा 23 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 12 वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करण्यात येईल. न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्यात येईल त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन व सत्ताधाऱ्यांवर राहील, असा ठाम इशाराही महिलांनी दिला आहे.

# तारा नारायण चालूरकर यांचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : बुध्दवासी तारा नारायण चालूरकर या वयाच्या ६० वर्षी बुद्धवासी झाले आहे. दिनांक ०६/०२/२०२६ रोजी मौजा नवेगाव, गडचिरोली येथील आपल्या निवासस्थानी अचानक प्रकृती अस्वस्थ झाल्याने उपचारादरम्यान रात्रौ सुमारे 02.35 वाजता हृदयविकाराचा झटका आल्याने प्राण गमवावे लागले.

त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले असुन अंत्ययात्रेत नातेवाईक, मित्र मंडळी व नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित होते. त्यांच्या पश्चात परिवारात पती नारायण चालूरकर, पायल दिपक चालूरकर (सून -मुलगा )प्रियंका संदीप चालूरकर (सून -मुलगा )शितल स्वप्नील चालूरकर (सून -मुलगा )रेयांश, स्पंदन, सारांश, स्वरांश, (नातू -नातीन ) असा मोठा आप्त परिवार आहे.



# आमदार सई डहाके यांच्या शपथपत्रावर गंभीर आरोप

## खोट्या प्रतिज्ञापत्राचा दावा, चौकशी व कारवाईची मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

यवतमाळ : कारंजा–मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. सई डहाके यांनी विधानसभा निवडणूक 2024 दरम्यान निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या शपथपत्रातील माहिती खोटी असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते भिमराव राठोड यांनी केला आहे. या आरोपामुळे राजकीय व सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली असून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भिमराव राठोड यांनी केलेल्या आरोपानुसार, आमदार सई डहाके यांनी शपथपत्रात केवळ एका मुलाचा उल्लेख केला आहे, मात्र प्रत्यक्षात त्यांना दोन मुले असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे शपथपत्रामध्ये चुकीची माहिती सादर करण्यात आल्याचा गंभीर दावा त्यांनी केला आहे.

राठोड यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, निवडणूक आयोगाकडे सादर होणारे शपथपत्र हे कायदेशीर दस्तऐवज असून त्यामध्ये खोटी माहिती देणे हा थेट फौजदारी गुन्हा ठरतो. ही बाब लोकशाही व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर घाला घालणारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कायदेशीर बाबींचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, शपथपत्रात खोटी माहिती देणे हे भारतीय दंड संहिता (IPC) कलम 177 (खोटी माहिती देणे), कलम 191 ते 193 (खोटी साक्ष – Perjury) तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम (Representation of the People Act) अंतर्गत गंभीर गुन्हा ठरू शकतो आणि त्यातून अपात्रतेची कारवाईही होऊ शकते.

### भिमराव राठोड यांच्या प्रमुख मागण्या

- या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी व्हावी, निवडणूक आयोगाने तातडीने दखल घ्यावी, तथ्य सिद्ध झाल्यास आमदारांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, गरज भासल्यास आमदारपदाबाबत कायदेशीर पुनर्विचार व्हावा, या प्रकरणामुळे राजकीय क्षेत्रात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून विरोधकांकडून चौकशीची मागणी होत आहे. सामाजिक संघटनांनीही या प्रकरणात कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

### लोकशाहीत खोट्या प्रतिज्ञापत्राला माफी नसते

- असे मत व्यक्त करत राठोड यांनी सांगितले की, शपथपत्र ही लोकशाही व्यवस्थेची आधारशिला आहे. जर लोकप्रतिनिधीच शपथपत्रात असत्य माहिती देत असतील, तर तो केवळ नैतिक प्रश्न नसून गंभीर कायदेशीर गुन्हा ठरतो. त्यामुळे हे प्रकरण केवळ राजकीय चर्चेपुरते मर्यादित न राहता, कायदेशीर कारवाईपर्यंत गेले पाहिजे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

## १२ फेब्रुवारीला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सीटू चे आंदोलन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे



गडचिरोली : फेब्रुवारी रोजी केंद्र व राज्य सरकारच्या कामगार विरोधी, शेतकरी विरोधी धोरणांच्या विरोधात देशव्यापी सार्वत्रिक संपाची हाक देण्यात आली आहे. या आंदोलनात 30 कोटींहुन अधिक कामगार, शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील ५ हजारांहून अधिक कामगार, शेतकऱ्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 12 वाजता आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनात जिल्ह्यातील कंत्राटी कामगार आणि शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ.अमोल मारकवार यांनी केले आहे. कामगारांवर अन्याय करणाऱ्या चार श्रमसंहिता रद्द करा, असंघटित कामगारांना 26 हजार रुपये वेतन देण्यात यावे, 60 वर्षे वरील सर्व कामगार, शेतकरी, शेतमजूरांना 5000/- रुपये मासिक पेन्शन देण्यात यांवे इत्यादी मागण्या करण्यात येणार आहेत. या आंदोलनात अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शालेय पोषण आहार कर्मचारी, अंशकालीन परीचर कामगार व शेतकरी, शेतमजूर यांच्या सर्व संघटना आंदोलनात सहभागी होणार आहेत. या आंदोलनाचे नेतृत्व सिटु संघटनेचे कॉम्रेड. रमेशचंद्र दहिवडे, कॉ.जामदार , कॉ. अमोल मारकवार, डॉ. धर्मराज सोरदे, राज बन्सोड हे करणार आहेत.

## संक्षीप्त



### कोरची तालुक्यात आजपासून उच्च माध्यमिक शालांत परीक्षा ; सुमारे ५०० च्यावर विद्यार्थ्यांचा सहभाग

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कोरची : आजपासून कोरची तालुक्यात उच्च माध्यमिक शालांत (इयत्ता १२ वी) परीक्षेला सुरुवात झाली असून तालुक्यातील सुमारे पाचशे विद्यार्थी या महत्त्वाच्या परीक्षेत प्रविष्ट झाले आहेत. तालुक्यातील जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय, बेडगाव आणि वनश्री महाविद्यालय, कोरची ही दोन परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी केंद्रप्रमुखांनी कर्मचाऱ्यांना सक्त सूचना दिल्या आहेत. गेल्या वर्षी परीक्षेचे कामकाज बाहेरील स्त्रोतांतील कर्मचाऱ्यांमार्फत पार पडले होते; मात्र यंदा स्थानिक कंडक्टर व कर्मचारी परीक्षेचे कामकाज सांभाळत असून त्यामुळे व्यवस्थापन अधिक सुकर झाले आहे. आज पहिला पेपर इंग्रजी विषयाचा असल्याने सकाळपासूनच परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी व पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. वेळेत परीक्षा केंद्र गाठण्यासाठी अनेक पालक विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये थोडा तणाव असला तरी प्रशासनाच्या नियोजनामुळे परीक्षा शांततेत सुरू असल्याचे चित्र आहे. परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन व केंद्रप्रमुखांचे प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहेत.



### महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कडे सातत्याने पाठपुरावा केल्या नंतर जवाहरलाल नेहरू शाळेच्या प्रयत्नांना यश...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : पि.एम.श्री जवाहरलाल नेहरू शाळा हि कुठली खाजगी आंतरराष्ट्रीय शाळा नसून, नगर परिषद गडचिरोली ची महाराष्ट्रातील पहिली ISO प्रमाणित, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धा 2024 मध्ये राज्यात तृतीय क्रमांक प्राप्त पीएम श्री जवाहरलाल नेहरू न.प. उच्च प्राथमिक शाळा रामनगर, गडचिरोली हि आहे. गेली तीन वर्षापासुन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कडे सातत्याने पाठपुरावा केल्या नंतर आज या प्रयत्नांना यश आले, असून नुकताच शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा IDEAL CENTER स्थापीत करण्यात आले आहे. या प्रयोगशाळेत अद्ययावत तंत्रज्ञान व सुविधेसह जसे टचस्क्रीन, हेडफोन, माईक, कॅमेरा, टचपेन सह 24 संगणक आहेत. यासर्व संगणकात सर्व विषयाचा अभ्यासक्रम साठविला आहे. हे सर्व संगणक शिक्षकांच्या मुख्य संगणकाला जोडले आहेत. याव्दारे इतर सर्व संगणकांवर नियंत्रण ठेवता येते. या संगणक प्रयोगशाळे मुळे विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा सराव, कोडींग, AI चे धडे घेणे सोपे होणार आहे.




### माजी राज्यमंत्र्यांची उपोषणस्थळी भेट ; रस्तेप्रश्नावर तोडगा काढण्याचे आश्वासन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

एटापल्ली : एटापल्ली तालुक्यातील प्रमुख रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात सुरू असलेल्या साखळी उपोषणाला आज महत्त्वाचे राजकीय वजन प्राप्त झाले असून माजी राज्यमंत्री अंबरीशराव आत्राम यांनी दिनांक 9 फेब्रुवारी रोजी आंदोलनस्थळी भेट देत उपोषणकर्त्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. रस्त्यांच्या प्रश्नावर पत्रकार संघटनेने छेडलेल्या आंदोलनाची त्यांनी दखल घेत मागणी रास्त असल्याचे स्पष्टपणे मान्य केले. एटापल्ली – देवदा – गडचिरोली, एटापल्ली – जारावंडी तसेच एटापल्ली – हेडरी–गट्टा या प्रमुख मार्गांची दयनीय अवस्था प्रत्यक्षात किती गंभीर आहे, याची माहिती उपोषणकर्त्यांनी माजी मंत्र्यांना दिली. वारंवार निवेदने देऊनही कामे सुरू न झाल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे सांगताना, नागरिकांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावेळी अंबरीशराव आत्राम यांनी उपोषणकर्त्यांना संबोधित करताना रस्त्यांची मागणी पूर्णपणे रास्त व न्याय्य असल्याचे सांगितले. "नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होणे योग्य नाही. मी स्वतः संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्याशी तातडीने चर्चा करून या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार," असे आश्वासन त्यांनी दिले. माजी मंत्र्यांच्या भेटीमुळे आंदोलन कर्त्यांमध्ये काही प्रमाणात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असले तरी, प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला. केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस प्रशासकीय निर्णय होणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, उपोषणाला भारतीय जनता पार्टी,राजमुद्रा फाऊंडेशन, मार्कंडेय पदमशाली समाज बहुउद्देशीय संस्था, व्यापारी संघटना एटापल्ली, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,भारतीय कम्युनिस्ट पार्टी, पाणी पुरवठा सभापती एटापल्ली, प्रशांत आत्राम, राहुल कुळमेथे, विजय खरवडे असे विविध संघटना, पक्ष व नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असताना माजी राज्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनावर दबाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आता त्यांच्या आश्वासनानंतर प्रत्यक्षात कामाला गती मिळते का, याकडे तालुकावासीयांचे लक्ष लागले आहे आंदोलनात सहभागी पत्रकार: या आंदोलनात रवींद्र रामगुंडेवार (अध्यक्ष),विनोद चौव्हान, गजानन खापणे,मुकेश कावळे,जनार्धन नल्लावार, मणीकंठ गादेवार, महेंद्र सुल्वावार, तनुज बल्लेवार, प्रशांत मंडल, अमित कत्तीवार, तेजस गुज्जलवार, शैलेश आकुलवार आणि विश्वनाथ जांभूळकर यांच्यासह अनेक पत्रकार सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

# एटापल्ली पत्रकार संघटनेचे बेमुदत साखळी उपोषण सुरू

## रस्ते दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर ; विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचा आंदोलनाला जाहीर पाठिंबा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

एटापल्ली : तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था आणि प्र शा सनाकडून होणारे दुर्लक्ष याच्या नि षेधार्थ एटापल्ली पत्रकार संघटनेने आ क्रमक पवित्रा घेतला आहे. आज, ९ फेब्रुवारी २०२६ पासून सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.जोपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा ठाम निर्धार पत्रकारांनी व्यक्त केला आहे.

एटापल्ली तालुक्यातून जिल्हा मुख्यालयाला जोडणारा एटापल्ली–देवदा–गडचिरोली मार्ग, तसेच एटापल्ली–जारावंडी आणि एटापल्ली–हेडरी–गट्टा हे तीनही मुख्य रस्ते सध्या मृत्यूचे सापळे बनले आहेत.

अपघातांचे प्रमाण वाढले: खड्ड्यांमुळे दररोज छोटे-मोठे अ प घात होत असून अनेकांना आ प ले प्राण गमवावे लागले आहेत. रुग्णांचे हाल: विशेषत: गर्भवती महिला, वृद्ध आणि गंभीर रुग्णांना रुग्णवाहिकेतून ने ताना रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा वाटेतच रुग्णांची प्रकृती अधिक बिघडत असल्याच्या संतापजनक घटना समोर आल्या आहेत. या प्रश्नी व्हाईस ऑफ मीडिया आणि एटापल्ली प्रेस असोसिएशनने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशासनाला लेखी निवेदन देऊन दोन महिन्यांची मुदत दिली होती. मात्र, प्रशासनाने कोणतीही ठोस पावले न उचलल्याने अखेर लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला रस्त्यावर उतरावे लागले आहे.













### प्रशासनाची भेट, पण तोडगा नाही

■ सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता ए.एस. चेळकर यांनीही भेट देऊन "रस्त्याचे काम प्रस्तावित आहे" असे आश्वासन दिले. मात्र, "केवळ कागदी प्रस्तावांवर आता आमचा विश्वास नाही, प्रत्यक्ष मशीनरी रस्त्यावर उतरून काम सुरू होत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहील," असा इशारा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष रवींद्र रामगुंडेवार यांनी दिला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम आणि पोलीस निरीक्षक मच्छिंद्र नागरगोजे यांनी उपोषण स्थळाची पाहणी करून शांततेचे आवाहन केले.

### सर्वपक्षीय आणि सामाजिक पाठिंबा

■ पत्रकारांच्या या लढ्याला समाजाच्या सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. आज आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी अनेक मान्यवरांनी उपोषण मंडपाला भेट देऊन आपला पाठिंबा दर्शविला. यामध्ये प्रामुख्याने: रेखाताई मोहूर्ले (नगराध्यक्ष, एटापल्ली), नगरसेवक जितेंद्र टिकले, राघवेंद्र सुल्वावार, राहुल कुळमेथे, नामदेव हिचामी. राजगोपालजी सुल्वावार (शिवसेना जिल्हा संघटक), सचिन मोतकुरवार (भाकपा जिल्हा महासचिव), संभा हिचामी (राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष). विजय खरवडे (भारतीय जनसंसद), महेश मोहूर्ले (माळी समाज अध्यक्ष), सुशील रच्चावार (पदमशाली समाज अध्यक्ष) महेश पुल्लूरवार (अध्यक्ष व्यापारी संघटना एटापल्ली) यांसह अनेक पक्षाचे पदाधिकारी आणि अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### आंदोलनात सहभागी पत्रकार


■ या आंदोलनात रवींद्र रामगुंडेवार (अध्यक्ष), गजानन खापणे, जनार्धन नल्लावार, मणीकंठ गादेवार, महेंद्र सुल्वावार, तनुज बल्लेवार, प्रशांत मंडल, विनोद चौव्हान, अमित कत्तीवार, तेजस गुज्जलवार, शैलेश आकुलवार,मुकेश कावळे आणि विश्वनाथ जांभूळकर यांच्यासह अनेक पत्रकार सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

## अनुसूचित जाती व जमातीशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आयोगामार्फत प्रयत्न करण्यात येतील

### अनुसूचित जाती-जमाती आयोग उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम

गडचिरोली : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी आज गडचिरोली नगरपरिषदेला भेट देऊन नगराध्यक्षा प्रणोती निंभोरकर, उपस्थित पदाधिकारी व नगरसेवक तसेच मुख्याधिकारी सुर्यकांत पिदुरकर यांच्याशी विविध विषयांवर सविस्तर संवाद साधला. यावेळी त्यांनी नगरपरिषदेच्या कामकाजाचा आढावा घेत शासनाकडे पाठपुरावा करावयाचे प्रलंबित विषय, विशेषतः अनुसूचित जाती व जमातीशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आयोगामार्फत प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. ॲड. मेश्राम यांनी नगरपरिषदेत राबविण्यात येणाऱ्या लाड पागे समितीच्या योजनेची माहिती घेताना, सफाई कामगारांची मंजूर ११ पदांपैकी ९ पदे नगरपरिषदेने अधिकार नसताना व्यपगत केली असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या बाबत संबंधितांकडून स्पष्टीकरण देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच मागील एक वर्षात नगरपरिषदेने सादर केलेल्या विकासकामांच्या प्रस्तावांची पाहणी करून कोणते प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले याची माहिती घेतली. यासोबतच नगरपरिषदेचे लेखा परीक्षण कधी झाले, त्यामध्ये कोणते शेरे नोंदविण्यात आले याबाबतही त्यांनी विचारणा केली. लेखा परीक्षण अहवालाची प्रत्यक्ष पाहणी करत आर्थिक शिस्त आणि पारदर्शकतेवर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांना त्यांनी शुभेच्छा देत, नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचे आवाहन केले. नगरपरिषद भेटीनंतर त्यांनी धानोरा तालुक्यातील सिता टोला या आदिवासी गावाला भेट देऊन तेथील जुने कुर्मा घर तसेच नवीन 'मावा आस्काना लोण' (आपल्या हक्काचे घर) या संकल्पनेतून उभारलेल्या घराची पाहणी केली. आदिवासी समाजात मासिक पाळीच्या काळात महिलांना कुर्मा घरात ठेवण्याची प्रथा आहे. मात्र ही घरे अडगळीत, अस्वच्छ आणि आवश्यक सुविधांअभावी महिलांसाठी असुरक्षित ठरत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर स्पर्श समाजसेवी संस्थेने कुर्मा घराला पर्याय म्हणून 'मावा आस्काना लोण' ही संकल्पना पुढे आणली आहे. स्थानिक महिलांनी स्वतः श्रमदान करून ही घरे उभारली असून स्पर्श संस्थेने त्यांना आवश्यक सहकार्य केले आहे. या उपक्रमाचे ॲड. मेश्राम यांनी कौतुक करत महिलांच्या सन्मान, आरोग्य व सुरक्षिततेसाठी अशा सकारात्मक संकल्पनांना शासनस्तरावर पाठबळ देण्याची गरज व्यक्त केली. यासंदर्भात उद्या आदिवसी विकास विभागाकडून विस्तृत आढावा घेतला जाईल असे त्यांनी सांगितले. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त डॉ. सचिन मडावी, स्पर्श संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीप बारसागडे तसेच स्थानिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## गोंडवाना विद्यापीठ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन रस्साखेच स्पर्धेत आदर्श महाविद्यालयाच्या मुलींनी पटकाविले तृतीय स्थान

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत आयोजित विद्यापीठ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन रस्साखेच स्पर्धेत आदर्श महाविद्यालय, देसाईगंज वडसा येथील मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकाविला. ही स्पर्धा दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाविद्यालय, चिमूर (जि. चंद्रपूर) येथे संपन्न झाली.

या स्पर्धेत आदर्श महाविद्यालयाच्या संघाने चुरशीच्या सामन्यांमध्ये दमदार खेळ सादर करून यश संपादन केले. या संघामध्ये कु. नेहा मडावी, किरण होळी, दिव्या घरत, मेघा चनाप, भाग्यश्री सहारे, यामिना बालापुरे, मोनिका मारबते, नंदिनी बोगा, रोशनी काटणगे, वृषाली वटी व तोरणा चर्जे या विद्यार्थिनींचा समावेश होता. सर्व खेळाडूंनी संघभावना, शिस्त व मेहनतीच्या जोरावर महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. या विद्यार्थिनींना क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजू चावके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. बक्षीस वितरण समारंभासाठी गांधी सेवा समिती, चिमूर चे कोषाध्यक्ष प्रा. पिसे सर, आर.टी.एम. महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उदय मेंडुलकर, तसेच विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक — डॉ. कुलदीप गोंड (सरदार पटेल महाविद्यालय), डॉ. संघपाल नारनवरे (चिंतामणी महाविद्यालय), डॉ. शैलेश गिरीपुंजे (चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या यशाबद्दल महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक व विद्यार्थ्यांकडून संघाचे अभिनंदन करण्यात येत आहे.




## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय स्थलांतरीत

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय एस. टी. डेपो समोर, धानोरा रोड, गडचिरोली या पत्त्यावर स्थित आहे. सदर कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले असल्यामुळे, त्या ठिकाणी कार्यरत कार्यालय तात्पुरते एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली (एल. आय.सी कार्यालयाजवळ) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. तरी सर्व नागरिकांनी पुढील प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली (LIC ऑफीस जवळ) येथे स्थलांतरित झालेल्या उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, गडचिरोली कार्यालयाशी संपर्क साधावा. असे उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांनी कळविले आहे.

# गडचिरोली जिल्हा पोलीस भरतीला ११ फेब्रुवारीपासून प्रारंभ

## प्रत्येक उमेदवाराकडे गडचिरोली जिल्ह्याचे वैद्द रहिवासी प्रमाणपत्र असणे अनिवार्य

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : दि.10/02/2026 गडचिरोली पोलीस दलामार्फत चालक पोलीस शिपाई भरती – 2024-2025 (प्रत्यक्ष भरती प्रक्रिया 2026) 27 जागांसाठी तसेच गडचिरोली पोलीस शिपाई भरती – 2024-2025 (प्रत्यक्ष भरती प्रक्रिया 2026) 717 जागांकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून सदर दोन्ही भरती करिता मैदानी (शारिरीक) चाचणीची तारीख जाहिर झालेली असून ती दिनांक 11/02/2026 ते 08/03/2026 या कालावधीत गडचिरोली पोलीस मुख्यालयातील पटांगणावर आयोजित करण्यात आलेली आहे. सविस्तर वृत्त असे की, 27 चालक पोलीस शिपाई पदाकरिता 3296 उमेदवारांनी आपले अर्ज सादर केले असुन त्यापैकी 2797 पुरुष उमेदवार व 499 महिला उमेदवार यांचे आहेत. तसेच पोलीस शिपाईच्या 717 पदाकरिता एकुण 23,791 उमेदवारांनी अर्ज सादर केले असुन त्यापैकी 16,310 पुरुष उमेदवार व 7, 481 महिला उमेदवार यांचे आहेत. चालक पोलीस शिपाई पदाच्या एकुण 27 जागांपैकी अनुसुचित जाति- 03, अनुसुचित जमाति-06, विज-(अ)-01, भज(ब)-01, भज(क)- 01, भज (ड)-01, विमाप्र-01, इमाव-05, एसईबीसी-02, इडब्ल्युएस-02, अराखीव-04 अशा स्वरुपात पदभरती घेण्यात येणार असुन, ती दि.11/02/2026 ते 13/02/2026 या कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे.

या सोबतच पोलीस शिपाई पदाच्या एकुण 717 जागांपैकी अनुसुचित जाती-84, अनुसुचित जमाति-92, विज(अ)-08, भज (ब)-08, भज (क)- 08, भज (ड)-15, विमाप्र-08, इमाव-121, एसईबीसी-58, इडब्ल्युएस-58, अराखीव-257 अशा स्वरुपात पदभरती घेण्यात येणार असुन ती दि.14/02/2026 ते 07/03/2026 या कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे. सदर भरती प्रक्रीयेदरम्यान दि. 11/02/2026 रोजी पहिल्या दिवशी 1300 उमेदवारांची व त्यानंतर दरदिवशी सरासरी 1500 उमेदवारांची शारिरिक (मैदानी) चाचणी घेण्यात येणार आहे. सर्व उमेदवारांना पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई पदाच्या मैदानी (शारिरीक) चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तरी, सर्व उमेदवारांनी आपले मैदानी (शारिरीक) चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र https://policerecruitment2024.mahait.org या वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन घ्यावे तसेच प्रवेशपत्रावर नमूद असलेल्या मैदानी (शारिरीक) चाचणी परिक्षेची तारीख लक्षात घेऊन मैदानी (शारिरीक) चाचणी करीता आवश्यक कागदपत्रासह पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे हजर राहणेबाबत गडचिरोली पोलीस दलामार्फत कळविण्यात येत आहे.

सदर पदभरती प्रक्रिया ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पुर्णपणे पारदर्शक पध्दतीने करण्यात येणार असुन यामध्ये उमेदवारांची छाती - उंची या शारीरीक मोजणीकरीता पीएसटी (PST) Digital Physical Standard Test तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच उमेदवारांची 1600 मी. धावणे (पुरुष), 800 मी. धावणे (महिला), 100 मी. धावणे (पुरुष व महिला) च्या चाचणी करीता (RFID) Based Technology चा वापर करण्यात येणार आहे.

यासोबतच गोळा फेक चाचणीकरीता Prism Technology आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. मैदानी (शारिरीक) चाचणीमध्ये उत्तीर्ण होवुन लेखीपरीक्षेकरीता पात्र उमेदवारांची बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी घेवुन पडताळणी करण्यात येणार आहे. जर पावसामुळे एखादे दिवशी मैदानी चाचणी होवुन शकली नाही तर त्यांना पुढची सुयोग्य तारीख दिली जाईल. सोबतच काही उमेदवारांना वेगवेगळ्या पदाकरीता एकापेक्षा जास्त ठिकाणी आणि एकाच दिवशी मैदानी चाचणी करीता हजर राहण्याची सुचना प्राप्त झाली अशा उमेदवारांना दुसरी तारीख दिली जाईल. उमेदवारांना इतर काही अडचणी आल्यास त्याचे निरसन स्थानिक पातळीवर करण्यात येईल.

सदर पदभरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांनी कोणत्याही गैरमार्गाचा वापर करु नये,असे करतांना आढळुन आल्यास उमेदवाराची उमेदवारी तात्काळ रद्द करुन त्याचेवर प्रचलित कायद्यान्वये योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. उमेदवारांनी कुठल्याही प्रलोभन किंवा आमिषाला बळी पडू नये तसेच कोणीही आमिष किंवा प्रलोभन देत असेल तर पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली येथील समाधान कक्ष, दुरध्वनी क्र.8806312100 यावर तसेच उपविभागीय कार्यालय/पोस्टे/उपपोस्टे/पोमकें येथे माहिती द्यावी.




## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




खा ... आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता ... की १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न...
जि...
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**